


# हॅलो प्रभात

PRGI NO. MAHMAR/25/A3118

▪ संपादक : संजीव शाळगावकर

पुणे आवृत्ती

▪ मुंबई ▪ अहिल्यानगर ▪ कोल्हापूर ▪ सातारा ▪ सांगली

पुणे ▪ वर्ष : ०१ ▪ अंक : १५७ ▪ शुक्रवार, ०८ मे २०२६ ▪ किंमत : ३ रुपये ▪ पाने : ४


## संक्षिप्त...

### आज दहावीचा निकाल

**मुंबई : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी (SSC) परीक्षेचा निकाल आज दुपारी १ वाजता ऑनलाइन जाहीर करण्यात येणार आहे. निकाल जाहीर करण्यापूर्वी सकाळी ११ वाजता मंडळाची पत्रकार परिषद होणार आहे.

### 'शून्य सावली'चा दुर्मिळ योग

**कुरुंदवाड : हॅलो प्रभात**

खिद्रापूर (ता. शिरोळ) येथील कोपेश्वर मंदिर परिसरात गुरुवारी (दि.७) धार्मिक परंपरा आणि खगोलशास्त्रीय वैशिष्ट्यांचा दुर्मिळ संगम अनुभवायला मिळाला. पहाटे पारंपरिक 'किरणोत्सव' सोहळ्यात सूर्यकिरणांनी शिवलिंगपिंडी उजळून निघाल्यानंतर दुपारी 'शून्य सावली' हा खगोलीय चमत्कारही नागरिकांनी प्रत्यक्ष अनुभवला. त्यामुळे दिवसभर मंदिर परिसरात भाविक, पर्यटक, विद्यार्थी आणि खगोलप्रेमींची मोठी गर्दी झाली होती.

### ई-केवायसी न करणाऱ्यांवर प्रशासनाची नजर

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

वारंवार मुदत देऊनही जिल्ह्यातील तब्बल ३ लाख ५६ हजार नागरिकांची रेशन कार्डसाठीची ई-केवायसी झालेली नाही. अशा ई-केवायसी न करणाऱ्या नागरिकांवर प्रशासनाची नजर आहे. मिशन सुधार मोहिमेअंतर्गत या नागरिकांचे धान्य बंद होण्याची शक्यता आहे. राज्यात सध्या रेशन कार्डवर नोंद असलेल्या नागरिकांची ई-केवायसी केली जात आहे. त्याला वारंवार मुदत वाढवून दिली जात आहे, तरीही जिल्ह्यात तब्बल १६.४८ टक्के नागरिकांची ई-केवायसी झालेली नाही.

### तरसाच्या हल्ल्यात १३३ कोंबड्यांचा मृत्यू

**सोलापूर : हॅलो प्रभात**

सांगोला तालुक्यातील वाकी (शिवणे) अंतर्गत असलेल्या जाधववाडी येथील राजू दिगंबर होवाळ या शेतकऱ्याच्या देशी कोंबडी पोल्ट्री फार्मवर तरसांनी हल्ला केला. या हल्ल्यात सुमारे १३३ कोंबड्यांचा मृत्यू झाल्याने शेतकऱ्याचे सुमारे ५० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. सांगोला तालुक्यातील वाकी(शिवणे) अंतर्गत जाधववाडी येथे राजू दिगंबर होवाळ या शेतकऱ्याची शेती आणि देशी कोंबड्यांचा पोल्ट्री फार्म आहे.

# भारत-व्हिएतनाम संबंध बळकट करण्यासाठी महाराष्ट्र सज्ज

## ▸▸ देवेंद्र फडणवीस

### बौद्ध पर्यटन, उद्योग, स्मार्ट सिटी आणि गुंतवणूक क्षेत्रात सहकार्य वाढविण्यावर भर

**मुंबई : हॅलो प्रभात**

भारत आणि व्हिएतनाम यांच्यातील सांस्कृतिक, आर्थिक आणि व्यापारी संबंध अधिक बळकट करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विश्वासार्ह भागीदार म्हणून कार्य करण्यास सज्ज असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांच्या एकदिवसीय मुंबई दौऱ्यानिमित्त आयोजित इंडिया-व्हिएतनाम बिझनेस फोरममध्ये ते बोलत होते.



मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्हिएतनाममधील उद्योजकांना महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याचे खुले आमंत्रण दिले. भारत-व्हिएतनाम भागीदारी अधिक दृढ होऊन 'एन्हान्स्ड कॉम्प्रेहेन्सिव्ह स्ट्रटेजिक पार्टनरशिप' नव्या उंचीवर गेल्याबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्राध्यक्ष तो लाम यांचे अभिनंदन केले.

महाराष्ट्राच्या समृद्ध बौद्ध वारशाचा उल्लेख करताना मुख्यमंत्री म्हणाले की, नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्म स्वीकारून आधुनिक काळात या धर्माला नवे अधिष्ठान दिले. तसेच अजिंठा आणि वेरुळ येथील जागतिक वारसा स्थळ असलेल्या बौद्ध व जैन लेण्यांना भेट देण्यासाठी व्हिएतनामच्या पर्यटक आणि गुंतवणूकदारांचे स्वागत असल्याचे त्यांनी सांगितले. छत्रपती संभाजीनगर आणि हो चि मिन्ह सिटी दरम्यान थेट हवाई सेवा सुरू करण्यासह स्वतंत्र बौद्ध पर्यटन सर्किट विकसित करण्याचा प्रस्तावही त्यांनी मांडला.

मुंबई आणि हो चि मिन्ह सिटी यांच्यातील साम्य अधोरेखित करत दोन्ही शहरांदरम्यान नुकत्याच झालेल्या सहकार्य कराराचे त्यांनी स्वागत केले. तसेच व्हिएतनाममधील विनग्रूप कंपनीच्या महाराष्ट्रातील ६.५ अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या प्रस्तावित गुंतवणूक कराराचा उल्लेख करत हा दक्षिण-पूर्व आशियातून झालेला सर्वात मोठा गुंतवणूक करार असल्याचे त्यांनी नमूद केले. मुंबई, नवी मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि गडचिरोली येथे उपलब्ध औद्योगिक संधींबाबत माहिती देत मुख्यमंत्री फडणवीस यांनी उद्योग, ऊर्जा, औषधनिर्माण, माहिती तंत्रज्ञान आणि पर्यटन क्षेत्रात व्हिएतनामच्या उद्योजकांनी गुंतवणूक करावी, असे आवाहन केले. मुंबई आणि पुणे येथील औषधनिर्माण उद्योग जागतिक दर्जाचे असून व्हिएतनामला परवडणारी जेनेरिक औषधे आणि लसींचा विश्वासार्ह पुरवठा करण्याची क्षमता महाराष्ट्रात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र-व्हिएतनाम व्यावसायिक परिषद दरवर्षी मुंबई आणि हो चि मिन्ह सिटी येथे आळीपाळीने आयोजित करण्याचा प्रस्तावही मुख्यमंत्र्यांनी मांडला. व्हिएतनामच्या प्रतिनिधींच्या मुंबईतील पहिल्या भेटीबद्दल आनंद व्यक्त करत त्यांनी या दौऱ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.

# सांगली-पेठ रस्त्यावरील अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करा



## ▸▸ आ. जयंतराव पाटील

**ईश्वरपूर : हॅलो प्रभात**

सांगली-पेठ मार्गावर वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर जयंतराव पाटील यांनी उपविभागीय पोलीस कार्यालयात संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना दिल्या. रस्त्याचा दर्जा सुधारल्यानंतर वाहनांचा वेग वाढल्याने अपघातांचे प्रमाणही वाढत असल्याचे बैठकीत निदर्शनास आले.

अपघात रोखण्यासाठी मार्गावर वेगनियंत्रक कॅमेरे बसविणे, धोकादायक ठिकाणी रम्बलर उभारणे, दुभाजकांच्या वळणांवर यलो लाईट ब्लिंकर्स बसविणे तसेच आष्टा आणि उरूण ईश्वरपूर परिसरातील बंद असलेल्या स्ट्रीटलाईट तातडीने सुरू करण्याच्या सूचना आ. पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. वाहतूक सुरक्षेबाबत कोणतीही हलगर्जीपणा सहन केला जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत उरूण ईश्वरपूर शहरातील वाहतूक कोंडी, अव्यवस्थित पार्किंग आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या प्रश्नांवरही चर्चा करण्यात आली. शहरातील महत्त्वाच्या चौकांमध्ये आणि गर्दीच्या भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसवून सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात आला. तसेच कराड - तासगाव आणि ईश्वरपूर-ताकारी मार्गावरील वाहतूक व रस्ते सुरक्षेचाही आढावा घेण्यात आला. या बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी अरुण पाटील, नगरपालिका मुख्याधिकारी पृथ्वीराज पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता स्वप्निल पाटील, प्रविण बिराजदार, पोलीस निरीक्षक संदीप पाटील, वाहतूक सहाय्यक पोलीस निरीक्षक अल्पेश लावंड यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# विटा कृषी उत्पन्न बाजार समितीत नवीन शेतकरी भवनास प्रशासकीय मान्यता

### आ. सुहास बाबर ; दीड कोटी निधी मंजूर

**विटा : हॅलो प्रभात**

खानापूर विधानसभा मतदारसंघातील शेतकरी सुविधांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या विटा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये नवीन शेतकरी भवन उभारण्यासाठी राज्य शासनाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी १ कोटी ५० लाख निधी मंजूर झाला असून, आमदार सुहास अनिलभाऊ बाबर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले आहे. विटा हे सांगली जिल्ह्यातील महत्त्वाचे व्यापारी केंद्र असून, बाजार समितीमध्ये दररोज मोठ्या प्रमाणात शेतकरी आणि व्यापाऱ्यांची वर्दळ असते. मात्र, येथे अद्ययावत शेतकरी भवनची आवश्यकता अनेक दिवसांपासून जाणवत होती. ही गरज ओळखून आमदार सुहास बाबर यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करत अखेर या प्रकल्पाला मंजुरी मिळवून दिली आहे.



या निधीतून उभारण्यात येणाऱ्या नवीन शेतकरी भवनमध्ये शेतकऱ्यांसाठी प्रशस्त निवास व्यवस्था, बैठकींसाठी सुसज्ज हॉल, स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातून बाजार समितीत येणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे, असे आमदार बाबर यांनी सांगितले.

पुढे बोलताना आ. सुहास बाबर म्हणाले, शेतकरी हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कृषी उत्पन्न समितीत येणाऱ्या शेतकऱ्यांना चांगल्या सुविधा मिळाव्यात, यासाठी नवीन शेतकरी भवनचा प्रस्ताव शासनाकडे सातत्याने मांडला होता. आता या कामाला मंजुरी मिळाल्याने शेतकऱ्यांसाठी अधिक सुसज्ज सुविधा उपलब्ध होतील.

राज्य शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागामार्फत काढण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार विटा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवीन शेतकरी भवनच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे बाजार समितीच्या पायाभूत सुविधांमध्ये भर पडणार असून, शेतकऱ्यांसाठी अधिक सुसज्ज भवन निर्माण होणार आहे. तसेच आटपाडी येथील शेतकरी भवनासाठीही प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला असून, त्यालाही लवकरच मंजुरी मिळेल, असा विश्वास आ.बाबर यांनी व्यक्त केला आहे.

# वाढीव घरपट्टीविरोधात व्यापारी संघटनांचा संताप

### कोणत्याही सुविधा नाहीत, मग करवाढ कशासाठी?

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली महानगरपालिकेकडून भांडवली मूल्याधारित वाढीव घरपट्टी लागू करण्याच्या हालचालींविरोधात व्यापारी व सामाजिक संघटनांतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. यासंदर्भात व्यापारी एकता असोसिएशनने प्रसिद्धीपत्रकाद्वारे महापालिका प्रशासन, लोकप्रतिनिधी व पालकमंत्र्यांकडे तीव्र शब्दांत निषेध नोंदविला आहे.

प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, प्रशासकांच्या कार्यकाळात वाढीव घरपट्टीची बिले देण्यात आल्यानंतर व्यापारी संघटनांनी मोठ्या प्रमाणावर आंदोलने व मेळावे घेऊन विरोध दर्शविला होता. त्यावेळी विद्यमान नगरसेवकांनीही या आंदोलनात सहभाग घेतला होता. तसेच पालकमंत्र्यांनी वाढीव घरपट्टीस स्थगिती दिल्याचे जाहीर केले होते.

**व्यापारी एकता असोसिएशनचा सवाल**

मात्र आता तेच नगरसेवक भांडवली मूल्याधारित करवाढीस कशी अनुकूलता दर्शवत आहेत, असा सवाल संघटनेने उपस्थित केला आहे. महापालिका क्षेत्रात कोणत्याही मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत. शहरातील बाजारपेठ महापालिकेच्या ढिसाळ व अक्षम्य कारभारामुळे शेवटच्या घटका मोजत आहे. अशा परिस्थितीत कोणतीही करवाढ आम्हाला मान्य नाही, असे संघटनेने स्पष्ट केले आहे.

करवाढीचा निर्णय घेण्यापूर्वी व्यापारी, सामाजिक संघटना व सर्व घटकांना विश्वासात घेऊन समिती स्थापन करून चर्चा केली जाईल, असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र त्याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

तसेच नूतन आयुक्त संघटनेच्या प्रतिनिधींना भेटण्यासाठी वेळ देत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. अधिकारी लोकांसाठी आहेत की लोक अधिकाऱ्यांसाठी, याची जाणीव प्रशासनाने ठेवावी, असा टोला संघटनेने लगावला आहे.

सर्व संबंधित घटकांशी चर्चा न करता कोणतीही करवाढ लागू करू नये, अन्यथा सांगलीत तीव्र आंदोलन उभे राहील, असा इशाराही प्रसिद्धीपत्रकातून देण्यात आला आहे. याप्रकरणी विद्यमान नगरसेवक, आमदार, खासदार व पालकमंत्र्यांनी तातडीने दखल घेऊन योग्य त्या सूचना द्याव्यात, अशी मागणी व्यापारी एकता असोसिएशनने केली आहे.

# डी. वाय. पाटील चे दोन संशोधक देशात 'टॉप टेन' मध्ये

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

पदार्थ विज्ञान क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या देशातील सर्वोत्कृष्ट संशोधकांच्या यादीत डी वाय पाटील अभिमत विद्यापीठ कोल्हापूरच्या दोन संशोधकाने 'टॉप टेन' मध्ये स्थान मिळवले आहे. रिसर्च डॉट कॉम या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक व संशोधन मूल्यमापन संस्थेने जाहीर केलेल्या या यादीत सेंटर फॉर इंटरडीसीप्लेनरी स्टडीजचे अधिष्ठाता डॉ. सी. डी. लोखंडे तिसरे तर संशोधन संचालक डॉ. प्रमोद एस. पाटील यांनी आठवे स्थान मिळवले आहे.

रिसर्च डॉट कॉम च्या अहवालानुसार, देशातील अव्वल संशोधकांची निवड डी इंडेक्स, संशोधनपत्रांची गुणवत्ता, संदर्भ, आणि संशोधन क्षेत्रातील प्रभाव या निकषांवर करण्यात आली. डॉ. चंद्रकांत डी. लोखंडे यांचा डी इंडेक्स, १०८ असून त्यांच्या संशोधन कार्याला ४१ हजार ७६४ हून अधिक संदर्भ प्राप्त झाले आहेत. जागतिक क्रमवारीत त्यांचा ७२५ वा क्रमांक आहे. तर डॉ. प्रमोद एस. पाटील यांचा डी इंडेक्स ९१ असून त्यांच्या संशोधनाला २९ हजार १६० हून अधिक संदर्भ मिळाले आहेत. जागतिक स्तरावर त्यांना १५५४ वा क्रमांक प्राप्त झाला आहे. त्याचबरोबर विद्यापीठाचे संशोधक डॉ. उमाकांत पाटील यांनीही या यादीत १८५ वे स्थान मिळवले आहे. त्यांचा डी इंडेक्स ४९ असून त्यांच्या संशोधनाला ६९४१ संदर्भ मिळाले आहेत.



> चार दशकांच्या समृद्ध, समर्पित अणि प्रेरणादायी शैक्षणिक प्रवास अर्थपूर्ण कर्तृत्वात परावर्तित होताना पाहून समाधान वाटते. कुलपती डॉ. संजय डी. पाटील, विश्वस्त, कुलगुरू तसेच संशोधक विद्यार्थी, कुटुंबिय व थोर व्यक्तींनी माझ्यावर टाकलेला विश्वास, सहकार्य व पाठबळ यामुळेच हे यश प्राप्त होऊ शकले.
>
> **डॉ. प्रमोद एस.पाटील**



> रिसर्च डॉट कॉम च्या यादीत मिळालेली क्रमवारी हे निश्चितच संशोधन कार्याची पावती आहे. या क्रमवारीत स्थान मिळवण्यासाठी स्वस्त ने केलेले सहकार्य व पाठिंबा व संशोधक विद्यार्थ्यांचे परिश्रम तितकेच महत्त्वाचे आहेत.
>
> **डॉ. सी. डी. लोखंडे**

डी वाय पाटील अभिमत विद्यापीठाने संशोधन आणि नवोपक्रम क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधली आहे. विद्यापीठातील संशोधकांनी ऊर्जा, नॅनोतंत्रज्ञान, सुपरकॅपॅसिटर, सौरऊर्जा, बॅटरी तंत्रज्ञान आणि आधुनिक पदार्थ विज्ञान या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर संशोधन केले असून अनेक संशोधन प्रकल्पांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. विद्यापीठाच्या नावावर अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पेटंट नोंदविण्यात आले असून संशोधनाधारित शिक्षण आणि उद्योगाभिमुख तंत्रज्ञान विकासावर विद्यापीठाचा विशेष भर राहिला आहे. संशोधनपर शेकडो शोधनिबंध आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले आहेत.

या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांनी संशोधकांचे अभिनंदन करताना सांगितले की, डी वाय पाटील अभिमत विद्यापीठाने नेहमीच गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत संशोधन आणि नवसंकल्पनांना सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. डॉ. सी. डी. लोखंडे आणि डॉ. प्रमोद एस. पाटील यांनी मिळवलेले हे यश विद्यापीठासाठी अभिमानास्पद असून संशोधन कार्याला आणखी गती मिळेल. संशोधनाच्या माध्यमातून समाजोपयोगी तंत्रज्ञान विकसित करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न यापुढेही अधिक ताकदीने सुरू राहील.


### डॉ.सी.डी.लोखंडे तिसऱ्या तर डॉ. प्रमोद एस. पाटील आठव्या स्थानी

रिसर्च डॉट कॉम ने यंदाच्या मानांकनासाठी OpenAlex, CrossRef यांसह विविध आंतरराष्ट्रीय डेटाबेसमधील माहितीचा आधार घेतला. देशातील २६३ मटेरियल्स सायन्स संशोधकांचा अभ्यास करून ही यादी तयार करण्यात आली. संशोधकांच्या शैक्षणिक योगदानासोबतच त्यांच्या संशोधनाचा समाज आणि विज्ञान क्षेत्रावर झालेला प्रभावही विचारात घेण्यात आला.

या यशाबद्दल कुलपती डॉ. संजय डी. पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष आमदार सतेज पाटील , विश्वस्त ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा, कुलसचिव डॉ. व्ही . व्ही . भोसले यांनी डॉ. लोखंडे आणि डॉ. पाटील यांचे अभिनंदन केले.

# कांद्याच्या दरांची घसरण कायम

**कराड : हॅलो प्रभात**



कराड बाजार समितीत कांद्याच्या दरात झालेल्या सततच्या घसरणीमुळे शेतकरी वर्ग चिंतेत सापडला आहे. मागील काही दिवसांपासून बाजारात कांद्याची आवक मोठ्या प्रमाणात वाढली असून, त्याचा थेट परिणाम दरावर झाला आहे. सध्या कांद्याला मिळणारा दर उत्पादन खर्चही भागवू शकत नसल्याने शेतकऱ्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. पाच - दहा रूपये किलो प्रमाणे शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी केला जात आहे.




## सत्तेच्या खेळातील 'सोयीचे' विरोधक

### महाराष्ट्रातील बदलती राजकीय गणिते

महाराष्ट्राच्या राजकारणात सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील संघर्ष जितका उघडपणे दिसतो, तितकाच एक वेगळा खेळ पडद्यामागे सतत सुरू असतो. हा खेळ असतो 'आवडते विरोधक' आणि 'नावडते विरोधक' यांचा. लोकशाहीत विरोधक हे सत्तेला प्रश्न विचारणारे असतात; मात्र प्रत्येक विरोधक सत्ताधाऱ्यांसाठी समान धोकादायक असतोच असे नाही. काही विरोधक सत्तेला सोयीचे ठरतात, तर काहींची आक्रमकता आणि जनाधार सत्ताधाऱ्यांना अस्वस्थ करणारी असते. त्यामुळेच राजकीय समीकरणांमध्ये कोणाला वाढू द्यायचे आणि कोणाला मर्यादित ठेवायचे, याचे नियोजन अनेकदा सूक्ष्म पातळीवर होत असते. देशातील विविध राज्यांतील राजकारण पाहिले तर ही बाब अधिक स्पष्ट होते. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस आणि तामिळनाडूमध्ये द्रमुकला अलीकडील निवडणुकांमध्ये बसलेले धक्के हे केवळ निवडणूक निकाल नाहीत, तर नव्या राजकीय प्रयोगांची चिन्हे आहेत. तामिळनाडूमध्ये अभिनेता विजय यांच्या तमिळगा वेत्री कळघम पक्षाभोवती निर्माण झालेली लाट अचानक तयार झालेली नाही. गेल्या काही वर्षांत त्यांच्या चित्रपटांतून व्यवस्थेविरोधातील प्रतिमा उभी राहिली आणि त्याचवेळी सत्ताविरोधी मतदारांना एक पर्याय देण्याचे प्रयत्न राजकीय पातळीवरही झाले. सत्तेला सोयीचा विरोधक निर्माण करण्याची हीच प्रक्रिया असते. महाराष्ट्रातही हे राजकारण नवीन नाही. शिवसेनेच्या सुरुवातीच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या आशीर्वादानेच सेनेला अप्रत्यक्ष बळ मिळत असल्याची चर्चा विरोधकांकडून होत असे. त्यावेळी मुंबईतील कामगार चळवळीचे डावे नेतृत्व काँग्रेससाठी मोठे आव्हान ठरत होते. त्या प्रभावाला मर्यादा आणण्यासाठी शिवसेना हा पर्याय पुढे आला, असे अनेक राजकीय अभ्यासक मानतात. म्हणजेच सत्ताधाऱ्यांच्या दृष्टीने 'उपयुक्त विरोधक' ही संकल्पना तेव्हाही अस्तित्वात होती. पुढे राज्यात शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने मजबूत प्रादेशिक आधार निर्माण केला. सहकार, साखर कारखाने, जिल्हा बँका आणि ग्रामीण राजकारण यांवर राष्ट्रवादीची पकड वाढत गेली. काँग्रेसला त्यांच्याशिवाय सत्ता शक्य राहिली नाही. मात्र त्याच काळात विरोधी बाकांवर काही नेत्यांना वेगळे महत्त्व मिळत गेले. नारायण राणे काँग्रेसमध्ये आले, राज ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्थापन केली आणि त्यांच्या आंदोलनांना मिळालेली प्रसिद्धी व राजकीय हवा याचा अप्रत्यक्ष लाभ काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीला झाला. २००९ च्या निवडणुकीत मनसेमुळे झालेल्या मतविभाजनाचा परिणाम शिवसेना-भाजप युतीला भोगावा लागला आणि सत्ताधारी आघाडी पुन्हा सत्तेत आली. राजकारणातील 'आवडता विरोधक' ओळखण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे त्या नेत्यांच्या संस्थात्मक वाढीकडे पाहणे. एखाद्या विरोधी नेत्याला सहजपणे संस्था उभारता येतात, त्यांच्या प्रकल्पांना सरकारी पाठबळ मिळत राहते, चौकशी यंत्रणा दूर राहतात आणि मतदारसंघात फार अडचणी निर्माण होत नाहीत, तर त्यामागील राजकीय संकेत समजून घ्यावे लागतात. उलट काही नेत्यांच्या मागे सतत चौकशा, अडथळे आणि राजकीय दबाव दिसत असेल, तर ते 'नावडते विरोधक' ठरत असल्याचे मानले जाते. २०१० नंतर महाराष्ट्राच्या राजकारणात नवे बदल सुरू झाले. मराठा समाजाचे संघटित मतदान, सहकारी संस्थांवरील प्रभाव आणि ग्रामीण भागातील सत्ता समीकरणे यांचा विचार करता राष्ट्रवादी काँग्रेसला पूर्णपणे संपविण्यापेक्षा सोबत ठेवणे अधिक फायद्याचे ठरू शकते, ही भूमिका भाजपामध्ये बळकट झाली. त्याचवेळी शिवसेना ही मराठी अस्मिता आणि आक्रमक भूमिकेमुळे स्वतंत्र ओळख टिकवून होती. त्यामुळे तिच्या मतांमध्ये फूट पाडण्यासाठी पक्षांतर्गत विभाजन आवश्यक असल्याची रणनीती आखली गेली, असे राजकीय घडामोडींवरून दिसते. आजची परिस्थिती पाहिली तर हे समीकरण आणखी स्पष्ट होते. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना सत्तेत असली तरी तिची स्वतंत्र राजकीय भूमिका वेळोवेळी समोर येते. त्यामुळे दीर्घकालीन सहयोगी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस अधिक स्थिर पर्याय ठरू शकते, असा विचार सुरू असल्याची चर्चा आहे. त्याच पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे नेतृत्व पुढे आणण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे दिसते. अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती परिसरात निर्माण झालेली भावनिक पोकळी आणि राष्ट्रवादीच्या दोन गटांच्या संभाव्य पुनर्मिलनाच्या चर्चा या राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या ठरल्या. अशा परिस्थितीत काँग्रेसने बारामतीत उमेदवार न देणे हा केवळ योगायोग मानणे कठीण आहे. परिणामी सुनेत्रा पवार यांना विक्रमी मताधिक्य मिळाले आणि बारामतीने त्यांचे नेतृत्व स्वीकारल्याचा संदेश राज्यभर गेला. विशेष म्हणजे, निवडणुकीनंतर सुप्रिया सुळे यांनी 'बारामतीत पवार विरुद्ध पवार अशी लढत होणार नाही' असे केलेले विधानही भविष्यातील राजकीय समीकरणांचे संकेत देणारे ठरते. स्वतः चा पारंपरिक मतदारसंघ सोडण्याची भाषा एखादा नेता सहज करत नाही. त्यामुळे पुढील काळात महाराष्ट्राच्या राजकारणात आणखी मोठ्या हालचाली होण्याची शक्यता नाकारता येत नाही. राजकारणात कायमस्वरूपी मित्र किंवा शत्रू नसतात, असे म्हटले जाते. महाराष्ट्रातील सध्याच्या घडामोडी हेच सिद्ध करत आहेत. कालपर्यंत आवडते असलेले विरोधक नावडते होतात आणि नावडते असलेले अचानक महत्त्वाचे सहयोगी ठरतात. सत्तेच्या केंद्रस्थानी राहण्यासाठी चालणारा हा खेळ निरंतर असतो. मतदार मात्र प्रत्येक वेळी नव्या आश्वासनांच्या आणि नव्या समीकरणांच्या भोवऱ्यात अडकत राहतो. महाराष्ट्राच्या राजकारणातील हे बदलते चेहरे आणि पडद्यामागील रणनीती समजून घेतल्याशिवाय राज्यातील सत्तासंघर्षाचे खरे चित्र स्पष्ट होणार नाही.

# रेडक्रॉस संस्थेचे मानवतावादी कार्य

**हॅलो प्रभात**

**हेनरी डुनान्ट रेडक्रॉसचे संस्थापक होय. स्वित्झर्लडमधील जिनिव्हा येथे ८ मे १८२८ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचा ८ मे हा जन्मदिवस 'रेडक्रॉस दिन' म्हणूनही जगभर साजरा केला जातो.**

**पांढऱ्यावरची लाल फुली :** अर्थात रेडक्रॉस जगभरातील १७० देशात असणारी संघटना ज्याचे सुमारे ९ कोटी ७० लाख स्वयंसेवक आहे. या संघटनेच्या कामाची मदत जगातल्या गरजू अशा २४ कोटींहून अधिक जणांना आजवर झाली आणि आपल्या कार्याबद्दल एकदा नव्हे तर तब्बल ३ वेळा शांततेचा नोबेल पुरस्कार प्राप्त झाला आहे. अशी संघटना अशी खूप मोठी ओळख जपण्याचं काम केलय 'रेडक्रॉस' ने. हो जगाच्या पाठीवर मानवाधिकार क्षेत्रात सर्वात मोलाचे काम या रेडक्रॉसने केले आहे.

८ मे हा रेडक्रॉस दिवस म्हणून जगात साजरा होतो. १९३९ ते १९४५ या चार वर्षांच्या कालावधीत दुसरं महायुध्द झालं. या काळात केवळ एकच नोबेल पुरस्कार दिला गेला तो देखील रेडक्रॉसला अर्थात रेडक्रॉसचे संस्थापक हेनरी डुनान्ट यांना देण्यात आला. ८ मे १९४८ रोजी पहिला रेडक्रॉस दिन साजरा झाला. या रेडक्रॉसचा इतिहास जाणून घेण्यासाठी आपणास १९ व्या शतकापर्यंत मागे जावे लागेल. स्वित्झर्लँडमधील व्यापारी हेनरी डुनान्ट यांना अल्जिरिया या देशात व्यापार सुरु करायचा होता. त्यात येणाऱ्या अडचणींबाबत चर्चा करण्यासाठी ते नेपोलियन (तिसरा) याची भेट घेण्यासाठी इटलीला गेले. कारण अल्जिरिया त्यावेळी फ्रेन्च वसाहतींचा भाग होता. ते अल्जिरियाच्या सोल्फेरिनो गावात पोहचले त्यावेळी ऑस्ट्रीया आणि सरदनियाच्या युध्दात २४ जून १८५९ रोजी एकाच दिवसात दोन्ही बाजूच्या सैन्याचे तब्बल ४० हजार सैनिक ठार झालेले त्यांनी पाहिले तर असंख्य जण उपचाराअभावी तडफडत होते.

या युध्दानंतर उद्भवलेल्या स्थितीचा डुनान्ट यांना धक्का बसला. औषधोपचार तर सोडा साध्या सुविधा देखील या ठिकाणी उपलब्ध नव्हत्या. माणुसकीच्या भूमिकेतून डुनान्ट यांनी आपल्या प्रवासाचा मूळ बेत बाजूला ठेवून अनेक दिवस या ठिकाणी या जखमी जवानांची सेवा करीत औषधोपचार केले. स्थानिकांच्या मदतीने त्यांनी मोठ्या प्रमाणावर मदत गोळा करुन दोन्ही बाजूच्या सैनिकांना ती देण्याचे काम त्यांनी केले. त्यानंतर जिनिव्हा येथे परतल्यावर १८६२ साली त्यांनी 'अ मेमरी ऑफ सोल्फरिनो' हे पुस्तक लिहून स्वखर्चाने प्रकाशित केले. या पुस्तकाच्या प्रती त्यांनी युरोपातील सैन्यप्रमुख व राजकीय नेत्यांना पाठवल्या. या युद्धानंतर निर्माण झालेल्या स्थितीचे वर्णन करताना त्यांना या पुस्तकात सामाजिक दायित्व म्हणून अशा स्थितीत मदत करणाऱ्या व सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या संस्थांची गरज का आहे याचे विवेचन विस्ताराने केले होते. अशा स्वरुपाची वैद्यकीय मदत पुरविणाऱ्या संस्थाना युध्दाच्या स्थितीत संरक्षण असावे व त्यांना जखमी कैद्यांवर उपचार करण्यास मुभा देण्याकरिता आंतरराष्ट्रीय कराराद्वारे हमी द्यावी, अशी आग्रही मागणीदेखील डुनान्ट यांनी केली.

या पुस्तकाची प्रत जिनिव्हाचे महापौर गुस्ताव्ह मोयनियर यांना प्राप्त झाली. डुनान्ट यांनी सुचवलेल्या सर्व बाबींचा विचार करुन आंतरराष्ट्रीय स्तरावर असे संघटन उभे करण्याचा निर्धार मोयनियर यांनी केला. त्यानंतर एक विख्यात शल्यचिकित्सक लुईस अपिया जिनिव्हा आरोग्य व स्वच्छता आयोगाचे अध्यक्ष अपिया यांचे मित्र थिओडोर मॉनिर स्वीस आर्मीचे जनरल गिलाम हेनरी ड्यूफोर यांच्यासह डुनान्ट यांना घेऊन 'जखमी व्यक्तींना मदत करणारी पाच सदस्यीय आंतरराष्ट्रीय समिती स्थापन केली ज्याला 'कमिटी ऑफ फाईव्ह' म्हणून ओळखले जाते. 'कमिटी ऑफ फाईव्ह' ने २६ ते २९ ऑक्टोबर या कालावधीत पुढील संघटन उभारण्यासाठी जिनिव्हा येथे आंतरराष्ट्रीय परिषद घेतली. या परिषदेला १८ शासकीय प्रतिनिधींसह सहा समाजसेवी संस्था आणि सात विदेशी अशासकीय प्रतिनिधींसह एकूण ३६ जणांनी हजेरी लावली. यानंतर म्हणजे एक वर्षाने २२ ऑगस्ट १८६४ रोजी एक परिषद झाली ज्यात युरोपातील सर्व देशासंह अमेरिका, ब्राझील आणि मेक्सिकोच्या सरकारांना निमंत्रण पाठवल्यने त्यांची उपस्थिती होती. अशा स्वरुपाची मदत युध्दप्रसंगी पुरवणाऱ्यांना संरक्षण देण्यास १२ देशांनी या परिषदेत मान्यता दिली ज्याला 'जिनिव्हा करार' म्हणून ओळखले जाते.नंतर १८६७ च्या आसपास अल्जिरियातील व्यवसाय असफल ठरल्याने हेनरी डुनान्ट यांना दिवाळखोरी जाहीर करावी लागली. त्यामुळे निराश होऊन त्यांचे या कामावरील लक्ष उडाले परंतु त्यांची मुळ संकल्पना मान्य झालेल्या देशांनी याचा पाठपुरावा सुरु ठेवल्याने १८७६ साली 'इंटरनॅशनल कमिटी ऑफ द रेडक्रॉस' (ICRC) अर्थात आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीची स्थापना झाली. आजही रेडक्रॉसची अधिकृत ओळख हीच आहे. ५ वर्षांनंतर देशात सर्वप्रथम 'रेडक्रॉस'ला स्थान देत 'अमेरिकन रेडक्रॉस' ची स्थापना सुरु झाली. स्थापनेपासून मानवाधिकारांची जपणूक करणारी संस्था म्हणून रेडक्रॉसची ओळख जगभरात वाढत गेली. १९०१ साली जीन हेनरी डुनान्ट यांच्या या महान कार्यांची दखल घेऊन नॉर्वेजियन नोबेल समितीने आंतरराष्ट्रीय शांततेसाठीच्या नोबेल पुरस्कारासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर या क्षेत्रात कार्य करणारे फ्रेडरिक पसी आणि हेनरी डुनान्ट यांना हा पुरस्कार संयुक्तरित्या प्रदान केला. जिनिव्हा करारानंतर हेगमध्ये झालेल्या रेडक्रॉसच्या १० व्या परिषदेत नव्या हेग करारास मान्यता प्रदान करण्यात आली. एव्हाना याचा विस्तार ४५ देशांमध्ये झाला होता. चळवळीत रुपांतर होऊन रेडक्रॉस आता युरोपबाहेर उत्तर, मध्य आणि दक्षिण अमेरिका, आफ्रिका आणि आशियात पोहोचले होते. अर्जेंटिना, ब्राझील, क्युवा मेक्सिको तसेच चीन, जपान, कोरियासारख्या देशात रेडक्रॉस विस्तारल्याने याला खरे आंतरराष्ट्रीय स्वरुप आले. १९१४ मध्ये पहिले विश्वयुद्ध झाले त्यात युरोपातील देशांसह अमेरिका आणि जपान हे देशदेखील ओढले गेले. युद्ध सुरु होताच आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस समितीने आंतरराष्ट्रीय युद्धकैदी समिती गठीत केली. या समितीने युद्धकाळात केलेल्या कार्याला तोडच नाही. केवळ १२०० स्वयंसेवक असणाऱ्या या समितीने युद्धकाळात तब्बल २ कोटी पत्र व संदेशांची देवाण-घेवाण केली. सुमारे १ कोटी ९ लाख पार्सल पोहोचविले. या युद्धात हानी झालेल्या देशांमध्ये १ कोटी ८ लाख स्वीस फ्रॅन्क रक्कमेचे मदत साहित्य पुरविले. इतक्यावर हे थांबले नाही तर युद्धबंदी असलेल्या देशांमध्ये संवादसेतू निर्माण करण्याचे महत्वाचे काम रेडक्रॉसने केले ज्यामुळे विविध देशात युद्धबंदी असणाऱ्या २ लाख सैनिकांना परत आपल्या कुटुंबापर्यंत पोहोचणे शक्य झाले. युद्ध काळातील या अतुलनीय मदत कार्यासाठी रेडक्रॉसला १९१७ साली नोबेलचा शांतता पुरस्कार देवून गौरवण्यात आले. हा रेडक्रॉसचा दुसरा नोबेल पुरस्कार होता. दुसऱ्या विश्वयुद्ध काळात ३००० स्वयंसेवकांच्या बळावर रेडक्रॉसने साडेचार कोटी पोस्टकार्ड आणि तब्बल १२ कोटी संदेश पोहचविण्याचे काम केले. या कामाचे मोल यासाठी की त्या काळी आजच्याइतकी प्रभावी दळण-वळण साधने नव्हती. दुसऱ्या महायुद्धाला मोठी वांशिक किनार होती.


हेनरी डुनान्ट




**• रेडक्रॉसची कार्यपध्दती पुढील सात तत्त्वांवर आधारित आहे.**

१) **मानवता** : मानवतेच्या दृष्टिकोणातून व्यक्ती-व्यक्तींमधील संबंध मैत्रीपूर्ण व्हावे. सर्वांनी एकमेकांना समजून घ्यावे व मानवतेचा आदर करावा.
२) **नि:पक्षपातीपणा** : राष्ट्र, धर्म, प्रांत, भाषा आणि वंश असा कोणताही भेद न बाळगता केवळ व्यक्तींची गरज पाहून प्रदान करणे.
३) **तटस्थता** : धार्मिक, वांशिक, राजकीय तसेच कोणत्याही वैचारिक वादात न अडकता तटस्थपणे सेवा देण्याचा विश्वास असणे.
४) **स्वातंत्र्य** : जगाच्या वेगवेगळ्या देशात कार्य करताना त्या त्या देशाचे स्वत:चे कायदे असले तरी सेवा देताना रेडक्रॉसला मुळ तत्वांची स्वायत्तपणे अंमलबजावणी करण्याचे स्वातंत्र्य.
५) **स्वयंसेवी सेवा** : कोणत्याही लाभाची अपेक्षा न बाळगता स्वयंस्फूर्तीने सेवा प्रदान करणे.
६) **ऐक्य** : रेडक्रॉसने मानवतावादी व्यवहार सर्वत्र एकसारखाच राखावा.
७) **वैश्विकता** : आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस-रेडक्रिसेंड चळवळीने सर्व समाज व मानवांप्रती समान भुमिका ठेवणे, समान दायित्व आणि कर्तव्य मानत जगात सर्वत्र एकमेकांना मदत करणे.

नाझी साम्राज्यात जर्मनीचा चॅन्सलर हिटलरने 'ज्यूं'चे शिरकाण करण्याचा चंग बांधला होता. त्यासाठीच्या त्या छळछावण्या आणि त्याच्या कटू कहाण्या आजही कानावर येत असतात. या छळछावण्यात आरोग्यसेवेची संधी मिळावी, ही रेडक्रॉसची विनंती होती. युद्ध संपेपर्यंत मदत करणाऱ्या स्वयंसेवकांना येथून बाहेर पडता येणार नाही या अटीवरच मान्यता देऊ, अशी भूमिका नाझी सैन्याने घेतली. त्याला आव्हान म्हणून दहाजणांनी मान्यता दिली आणि याच १० स्वयंसेवकांनी जवळपास ६० हजार 'ज्यू' नागरिकांचे प्राण या युद्धात वाचविले. रेडक्रॉसच्या या कार्याची दखल युद्धग्रस्त सर्वच देशात घेतली गेली. युद्धकालावधीत म्हणजे १९३९ ते १९४५ या काळात युद्धामुळे नोबेल पुरस्कार देण्यात आले नाहीत. मात्र युद्ध संपल्यावर अतुलनीय कामगिरीबद्दल 'रेडक्रॉस'ला पुन्हा शांततेसाठीचा नोबेल पुरस्कार प्रदान करण्यात आला व हा रेडक्रॉसचा तिसरा पुरस्कार होता.

**• रेडक्रॉस आणि भारत :** रेडक्रॉसचा जगभरात प्रचार व प्रसार होत होता त्या काळात अर्थात १९४७ पूर्वी भारत देश हा ब्रिटीश सत्तेच्या अंमलाखाली होता. त्यामुळे भारतात रेडक्रॉसचा प्रवेश 'ब्रिटीश रेडक्रॉस' म्हणून झाला. मात्र १९२० साली म्हणजे पहिल्या विश्वयुद्धानंतर दि. १७ मार्च १९२० रोजी भारतीय रेडक्रॉस सोसायटी कायदा १९२० पारित झाला. याला 'सांसदीय कायदा १९२०' म्हणून तत्कालीन गर्व्हनर जनरल यांनी मान्यता दिली. या कायद्यासंदर्भातील विधेयक भारतीय व्हाईसरॉय कार्यकारी समितीचे सदस्य सर क्लाऊड हिल यांनी दि. ३ मार्च १९२० रोजी सभागृहात मांडले होते.

पहिल्या विश्वयुद्धात ब्रिटीश रेडक्रॉसचा भाग असलेल्या भारतीय स्वयंसेवकांनी मदतकार्य केले होते. संयुक्त युद्ध समितीचे सर विल्यम माल्कम हेली यांच्या अध्यक्षतेखाली ५० सदस्यीय व्यवस्थापन समिती स्थापन करुन ७ जून १९२० रोजी औपचारिकरित्या भारतीय रेडक्रॉस समिती अधिकृतपणे अस्तित्वात आली. याच भारतीय रेडक्रॉसने नंतरच्या काळात देशांतर्गत आरोग्य समस्या तसेच दुसऱ्या विश्वयुद्धात आपल्या कामाचा वाटा उचलला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले आणि पाकिस्तानचीही निर्मिती झाली. यामुळे पहिल्या कायद्यात दुरुस्ती होऊन १९४७ मध्ये भारतीय रेडक्रॉसची नव्याने स्थापना झाली. ज्यात अखेरची दुरुस्ती १९९२ साली झालेली आहे. आजची भारतीय रेडक्रॉस देशभरात विस्तारित झाली आहे. कायद्यानुसार भारतीय रेडक्रॉसचे पदसिद्ध अध्यक्ष देशाचे राष्ट्रपती आहेत. राष्ट्रीय स्तरावर असलेल्या व्यवस्थापन परिषदेत १९ सदस्य असतात. व्यवस्थापन परिषद अध्यक्ष म्हणून केंद्रीय आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री आहेत. या १९ सदस्यांपैकी ६ जणांची नेमणूक राष्ट्रपती स्वत: करतात तर उर्वरित १२ सदस्य विविध राज्यातील रेडक्रॉस शाखांमधून निवडणुकीद्वारे परिषदेत सामील होतात. या निर्वाचित १२ आणि नियुक्त ६ सदस्यांनी नंतर उपाध्यक्ष निवडण्याची पद्धत आहे. कामकाजाची मुख्य जबाबदारी रेडक्रॉसचे सरचिटणीस यांची असते.

भारतीय रेडक्रॉस देशाच्या ७०० जिल्ह्यात आणि त्याखाली प्रांत व गावपातळीपर्यंत पोहोचलेली संघटना आहे. देशभरात आरोग्य यंत्रणा आणि त्याच्याशी निगडीत संस्थांच्या माध्यमातून रेडक्रॉस कार्यरत आहे. सोबत रेडक्रॉसचे स्वयंसेवकही वेगवेगळया प्रसंगी मानवतावादी दृष्टिकोणातून सेवा देत असतात. रेडक्रॉसचे काम खूप मोठे व अतुलनीय असे आहे. समाजात आपण सामाजिक बांधिलकी म्हणून सेवा द्यावी, अशी ही लोकचळवळ आहे. प्रत्येकाला रेडक्रॉसचा अल्पपरिचय असावा आणि आपणही योगदान जरुर द्यावे यासाठी हा लेखन प्रपंच.

## महाराष्ट्रातील पहिली रोबोटिक हृदय शस्त्रक्रिया यशस्वी

**सांगली : हॅलो प्रभात**

पुण्यातील हडपसर येथील नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटरने महाराष्ट्रातील पहिली रोबोटिक हृदय शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडत वैद्यकीय क्षेत्रात नवा इतिहास रचला आहे. 'रोबोटिक लेफ्ट एट्रियल मिक्सोमा एक्सिजन' ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया ५५ वर्षीय महिलेवर करण्यात आली.


नियमित तपासणीत रुग्णाच्या हृदयाच्या डाव्या कप्प्यात गाठ असल्याचे निदान झाले होते. ही गाठ कर्करोगजन्य नसली तरी स्ट्रोक किंवा श्वास घेण्यास त्रास यांसारख्या गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे शस्त्रक्रियेद्वारे ती काढणे आवश्यक होते.

पारंपरिक पद्धतीत छातीचे हाड कापून शस्त्रक्रिया केली जाते. मात्र नोबल हॉस्पिटलमध्ये रोबोटच्या साहाय्याने लहान छिद्रांद्वारे ही प्रक्रिया करण्यात आली. यामुळे मोठा छेद न देता गाठ अचूकपणे काढण्यात यश आले. या शस्त्रक्रियेमुळे रुग्णांना कमी रक्तस्त्राव, कमी वेदना, जलद बरे होणे आणि रुग्णालयात कमी कालावधी राहण्याचे फायदे मिळतात.

ही शस्त्रक्रिया हृदय शल्यचिकित्सक डॉ. धैर्यशील कणसे यांच्या नेतृत्वाखाली वरिष्ठ कर्करोग शल्यचिकित्सक डॉ. आशिष पोखरकर यांच्या सहकार्याने पार पडली. टीममध्ये डॉ. अनिरुद्ध ढेकणे, डॉ. एन. जाधव, डॉ. सम्राट मदनाईक आणि डॉ. परमिता दीक्षित यांचा समावेश होता.

## 'मर्दिनी' चित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**



मराठी चित्रपटसृष्टीत आता 'मर्दिनी' हा नवा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. चित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले असून, चित्रपटाची घोषणा करण्यात आली. पोस्टरमधील झलक आणि मांडणीमुळे चित्रपटाविषयी प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. हा चित्रपट ३ जुलै २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे.

## आयटेलने लाँच केला 'ए१00 सी न्यू' स्मार्टफोन

**मुंबई : हॅलो प्रभात**




आयटेलने नुकतेच ब्लॉकबस्टर व डिझाइनर ए१००सी न्यू स्मार्टफोन लाँच केला आहे. या स्मार्टफोनमध्ये मिलिटरी ग्रेड सर्टिफिकेशन (एमआयएल-एसटीडी-८१०एच) आहे. ए१००सी न्यू स्मार्टफोन २+४ जीबी रॅम आणि ६४ जीबी रॉमसह उपलब्ध आहे. सीएमआर ड्युरेबिलिटी इंडेक्स रिपोर्ट २०२६ नुसार, आयटेल १० हजारखालील सर्वात ड्युरेबल व रिलायबल मोबाइल ब्रँड आहे. किंमत फक्त ७९९९ रूपये असलेला हा स्मार्टफोन भारतभरातील रिटेल स्टोअर्समध्ये आकर्षक रंगांमध्ये उपलब्ध आहे.

## टी-२० मुंबई लीगसाठी सोबो मुंबई फाल्कन्सचा भक्कम संघ जाहीर

**मुंबई : हॅलो प्रभात**

सोबो मुंबई फाल्कन्स संघाने टी-२० मुंबई लीगच्या चौथ्या हंगामासाठी १७ सदस्यीय संघ निश्चित केला आहे. संघाने कर्णधार श्रेयस अय्यर याला २२ लाख रुपयांत कायम ठेवत नेतृत्वाची धुरा पुन्हा त्याच्याकडे सोपवली आहे. अष्टपैलू खेळाडू आकाश पारकर याला १२ लाख रुपयांच्या सर्वोच्च बोलीसह पुन्हा संघात स्थान देण्यात आले. संघाने अंगक्रिश रघुवंशी, इशान मुलचंदानी, हर्ष आघव आणि सिद्धार्थ राऊत यांनाही कायम ठेवले आहे. तसेच आदित्य तारे यांच्या समावेशामुळे यष्टिरक्षण आणि फलंदाजीला अधिक बळ मिळाले आहे. याशिवाय प्रथमेश डाके, यश डचोलकर, निखिल गिरी, काव्या गोरी, यश रामचंद्रनी, अर्हान मेकर, वेदांत गोरे, गौतम वाघेला, मोहम्मद ताहा आणि मयुरेश तांडेल यांचाही संघात समावेश करण्यात आला आहे.

## प्रादेशिक ओटीटी व्यासपीठ 'स्टेज' मराठीत दाखल!

**मुंबई : हॅलो प्रभात**

भारतातील सर्वात मोठे प्रादेशिकओटीटीव्यासपीठ 'स्टेज' आता मराठी भाषेत दाखल झाले असून, मराठी चित्रपट आणि वेब सिरीजच्या मनोरंजनविश्वाला नवे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. 'स्टेज'ने मराठी भाषेत प्रवेश करत प्रेक्षकांसाठी चित्रपट, वेब सिरीज आणि विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम उपलब्ध करून देण्याची घोषणा केली आहे.

## टीव्हीएस मोटरकडून 'टीव्हीएस आयक्यूब एस ४.७ केडब्ल्यूएच' इलेक्ट्रिक स्कूटर लॉन्च

**बंगळुरू : हॅलो प्रभात न्यूज नेटवर्क**

टीव्हीएस मोटर कंपनी ने लोकप्रिय फॅमिली ईव्ही मालिकेत नवीन 'टीव्हीएस आयक्यूब एस ४.७ केडब्ल्यूएच' इलेक्ट्रिक स्कूटर सादर केली आहे. या स्कूटरची दिल्लीतील एक्स-शोरूम किंमत १,३७,१४२ रुपये असून केंद्र व राज्य सरकारच्या अनुदानाचा त्यात समावेश आहे.

नवीन मॉडेलला आयडीसी प्रमाणित १७५ किलोमीटर रेंज मिळत असून दैनंदिन वापरासह लांबच्या प्रवासासाठीही ही स्कूटर उपयुक्त ठरणार आहे. स्कूटरमध्ये ४.७ केडब्ल्यूएच क्षमतेची मोठी बॅटरी देण्यात आली आहे.




कंपनीने या मॉडेलमध्ये 'मॅग्निफिसन्स पर्पल बेज', 'हार्लेक्विन ब्लू बेज' आणि 'टायटॅनियम ग्रे मॅट' असे नवीन रंग पर्याय उपलब्ध केले आहेत. अधिक रेंज, कनेक्टेड फीचर्स आणि सुरक्षिततेवर विशेष भर देत हे मॉडेल विकसित करण्यात आले आहे.

हॅलो प्रभात नवे विचार...नवी सुरुवात
■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक **हॅलो प्रभात**, कार्यालय : स.न.१४/१५/२/३, फ्लॅट नं.२०, शिवपुष्प, ए पार्क, वडगाव बु., पुणे- ४११०४१.(महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ The imprint line should be printed legibly as Printed by Published by GANESH BANDA PATIL on behalf of GANESH BANDA PATIL, printed at and published at S.No.14/15/2/3, Flat No.20, Shivpushpa, A Park, Vadgaon B. Pune- 411041 - Editor : Sanjeev Shalgaonkar
■ कोल्हापूर कार्यालय : गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२ ■ सांगली कार्यालय : कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली.४१६४१६
■ मुंबई कार्यालय : सी-५०३, निर्मल रेसिडेन्सी, कात्रप रोड, गणेश घाट, बदलापूर (पू), ठाणे - ४२१५०३. ■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)
■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर ■ संपादक : संजीव शाळगावकर ■ संपर्क : 8551055113

हॅलो प्रभात
MY CITY
पुणे-सांगली ३
शुक्रवार, दि. ०८ मे २०२६

# बारामती ते फलटण कनेक्शन..! डॉक्टर अटकेत

**पुणे : हॅलो प्रभात** : सोमेश्वरनगर ( पुणे जि. ) : बारामती तालुक्यातील १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणात बेकायदेशीर गर्भपात केल्याच्या आरोपावरून फलटण येथील डॉ. योगेश नरुटे याला वडगाव निंबाळकर पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईनंतर फलटण परिसरात बेकायदेशीर गर्भपाताचे रॅकेट कार्यरत असल्याचा संशय व्यक्त होत असून, प्रकरणामुळे मोठी खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वडगाव निंबाळकर परिसरातील अल्पवयीन मुलीवर काही दिवसांपूर्वी अत्याचार झाल्यानंतर ती गर्भवती असल्याचे समोर आले. त्यानंतर तिला उपचाराच्या नावाखाली फलटण येथील डॉ. नरुटे यांच्या खासगी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, गर्भपात करताना आवश्यक वैद्यकीय नियम, शासकीय परवानगी आणि बालसंरक्षणाशी संबंधित कायद्यांचे पालन न केल्याचा आरोप डॉक्टरवर ठेवण्यात आला आहे. या घटनेची माहिती मिळताच वडगाव निंबाळकर पोलिसांनी तपास सुरू केला. प्राथमिक चौकशीत संशय बळावल्याने पोलिसांनी डॉक्टरला ताब्यात घेत अटक केली. सहायक पोलिस निरीक्षक नागनाथ पाटील यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी (दि. ६) फलटण येथील संबंधित रुग्णालयात झाडाझडती घेण्यात आली. या वेळी महत्त्वाचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, या प्रकरणातून फलटण परिसरात बेकायदेशीर गर्भपाताचे मोठे रॅकेट कार्यरत असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### जय पवार यांच्या पहिल्याच जनता दरबाराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**बारामती : हॅलो प्रभात**

■ जनता दरबारला नागरिकांचा सहभाग

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवानेते जय अजित पवार यांनी आज बारामती येथे नागरिकांच्या समस्या तत्काळ मार्गी लावण्यासाठी जनता दरबाराची सुरुवात केली. पहिल्याच जनता दरबाराला नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती लावत आपल्या विविध समस्या जय पवार यांच्यासमोर मांडल्या. जनतेच्या अडचणी समजून घेत जय अजितदादा पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ दूरध्वनीद्वारे सूचना देत अनेक प्रश्न जागेवरच मार्गी लावले. नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या सोडवण्यावर भर देण्यात आला. बारामतीतील नागरिकांच्या समस्या जलदगतीने सोडवण्यासाठी दर आठवड्याच्या प्रत्येक गुरुवारी जय अजितदादा पवार जनता दरबाराच्या माध्यमातून नागरिकांना भेटणार आहेत.

### एशियन पेंट्सद्वारा सादर त्यांची नवीन कॉर्पोरेट मोहीम

**पुणे : हॅलो प्रभात**




भारतात, पत्ते आणि दिशा म्हणजे केवळ रस्त्यांची नावे किंवा पिन कोडच नाहीत. तर ते अनेकदा 'निळ्या घरा नंतर डावीकडे वळा' किंवा 'ते लाल घर जिथे प्रत्येक सणासुदीला पाहुणे येतात' अशा आठवणींना उजाळा देतात. ज्या देशात रंग सर्वत्र सर्वव्यापी आहे, तिथे घरे म्हणजे केवळ रंगवलेल्या भिंती नाहीत, तर ती सुपरिचित चिन्हे बनतात, ज्यांना लोक ओळखतात आणि त्यांच्याशी नाते जोडतात. 'रंग म्हणजेच खरा पत्ता' या कल्पनेच्या आधारे, एशियन पेंट्स आपली नवीन मोहीम 'रंगांची वॉरंटी' सादर करत आहेत, जी गेल्या वर्षी 'एशियन पेंट्सची वॉरंटी असे भारतातील प्रत्येक दुसरे घर सांगते' या मोहिमेद्वारे सुरू केलेला संवाद पुढे नेते. एका उबदार, भावनिक गाण्यावर आधारित हा चित्रपट, एशियन पेंट्सने रंगवलेली भारतीय घरे दैनंदिन जीवनाचा आणि आठवणींचा भाग कशी बनतात हे दाखवतो. आयुष्य बदलले तरी, हे रंग कसे तसेच राहतात; ते केवळ रंग न राहता, लोकांच्या ओळखीच्या परिचित जागा बनतात; साध्या, सहज जुळणाऱ्या क्षणांच्या माध्यमातून हा चित्रपट यावर जोर देतो. हा चित्रपट एशियन पेंट्सचे दीर्घकाळ टिकणारे रंग केवळ भिंतींवरच राहत नाहीत, तर ते लोकांच्या मनातही घर करतात आणि कालांतराने घरांची खरी ओळख बनतात, ही जाणिव दृढ करतो.

### २०१९ला सुनेत्रा पवार मुख्यमंत्रीपद अन् बारामतीच्या उमेदवार असतील : जय पवार

**पुणे : हॅलो प्रभात**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवानेते जय अजित पवार यांनी बारामती येथे जनता दरबाराची सुरुवात केली. पहिल्याच जनता दरबाराला नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याचे चित्र पहायला मिळाले. २०२९ मध्ये सुनेत्रा पवार या केवळ बारामती मतदारसंघाच्या उमेदवार नसतील, तर त्या मुख्यमंत्रीपदाच्या दावेदार असतील, असा मोठा दावा जय पवार यांनी केला. जनता दरबारानंतर जय पवार पत्रकारांशी बोलत होते. बारामतीतील जनतेच्या समस्या जलदगतीने सोडवण्यासाठी दर आठवड्याच्या प्रत्येक गुरुवारी जय अजित पवार जनता दरबाराच्या माध्यमातून नागरिकांना भेटणार आहेत. अजितदादा हे दर आठवड्याला जनता दरबार घेत नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करत होते. तोच प्रयत्न मी केला. पहिल्याच जनता दरबाराला चांगला प्रतिसाद मिळाला. आरोग्य, शिक्षण, वीज, पाणी, रस्ते अशा अनेक समस्या नागरिकांनी मांडल्या. या प्रश्नाबाबत अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात दिल्या आहेत. पाणीप्रश्नावर उपाययोजना करण्याच्या सूचनाही संबंधितांना दिल्या आहेत, अशी माहिती जय पवार यांनी दिली. काही दिवसांपूवर्वी माझ्या जवळच्या सहकार्यांबरोबर चर्चा झाली.

# नागरिकांना विश्वासात घेऊन उपाययोजना करा

## आमदार काटकेंचे वाहतूक शाखेला पत्र

**वाघोली : हॅलो प्रभात**

पुणे-नगर महामार्गावरील वाघोली येथील आव्हाळवाडी फाट्यावर वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी वाहतूक विभागाने १ मेपासून बॅरिकेड्स लावून यू-टर्न बंद केला. मात्र या निर्णयामुळे वाहतूक सुरळीत होण्याऐवजी कोंडीत अधिक वाढ झाल्याचे दिसून येत आहे. या समस्येबाबत वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी तातडीने दखल घेत वाघोली वाहतूक शाखेला पत्र पाठवले आहे. यू-टर्न बंद झाल्याने पुण्याकडून लोहगावकडे जाणाऱ्या वाहनांना केसनंद फाट्यावरून मोठा वळसा घ्यावा लागत आहे. त्यामुळे वाहनधारकांचा प्रवास वेळखाऊ ठरत असून मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. वेळ वाचवण्यासाठी काही वाहनचालक वाघेश्वर मंदिर चौकातून विरुद्ध दिशेने धोकादायक पद्धतीने वाहन चालवत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. पूर्वी केवळ दुचाकी वाहनांपुरती मर्यादित असलेली ही समस्या आता चारचाकी वाहनांपर्यंत पोहोचली



असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार कटके यांनी वाहतूक विभागाने स्थानिक नागरिक आणि वाहनधारकांना विश्वासात घेऊन व्यवहार्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. तसेच कोणताही पायलट प्रकल्प राबवण्यापूर्वी प्रत्यक्ष पाहणी आणि नागरिकांचे मत जाणून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात येईल, असे वाघोली वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल कोळंबीकर यांनी सांगितले.

> आव्हाळवाडी फाटा येथील चौक बंद करण्याचा निर्णय वाहतूक कोंडी कमी करण्याच्या उद्देशाने घेतला असला, तरी त्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. विरुद्ध दिशेने येणारी वाहतूक आणि संभाव्य अपघात लक्षात घेता या निर्णयाचा तातडीने पुनर्विचार होणे आवश्यक आहे. स्थानिक नागरिक, वाहनचालक आणि प्रशासन यांच्यासोबत समन्वय साधून व्यवहार्य उपाययोजना राबवून वाहतूक सुरळीत व सुरक्षित करावी.
>
> **- ज्ञानेश्वर कटके, आमदार, शिरूर-हवेली**

> या चुकीच्या नियोजनामुळे वाहतूक सुरळीत होण्याऐवजी पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. जिथे समस्या गुडघ्याची आहे, तिथे उपाय मात्र डोक्यावर केला जातोय, अशीच ही अवस्था झाली आहे. प्रशासनाने तातडीने वास्तव परिस्थिती ओळखून योग्य आणि परिणामकारक उपाययोजना करणे गरजेचे आहे.
>
> **- ॲड. गणेश म्हस्के, समन्वयक, शिवसेना, पुणे जिल्हा**

# सासवडमध्ये आज महाराजस्व समाधान शिबिर

**पुरंदर : हॅलो प्रभात**

■ नागरिकांच्या समस्या होणार ऑन-द-स्पॉट निकाली

पुरंदर तहसील प्रशासनाने लोकाभिमुख उपक्रम राबवत नागरिकांच्या महसुली अडचणी तत्काळ सोडवण्यासाठी शुक्रवार, दि. ८ मे २०२६ रोजी सासवड येथील आचार्य अत्रे सभागृहात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' आयोजित केले आहे. या शिबिरातून सासवड मंडल क्षेत्रातील नागरिकांचे प्रलंबित महसुली प्रश्न एकाच ठिकाणी सोडवण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. तहसील कार्यालयातील दिरंगाई, लालफितीचा कारभार आणि वारंवार फेऱ्या मारण्याच्या समस्यांमुळे नागरिक त्रस्त होते. विशेषतः ७/१२ उतारे, वारस नोंदी, फेरफार, जातीचे, उत्पन्नाचे व रहिवासी दाखले यांसारखी कामे अनेकदा महिनोनमहिने प्रलंबित राहत होती. ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाने 'कॅम्प मोड'मध्ये सेवा देण्याचा निर्णय घेतला आहे. शिबिरात विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामांसाठी आवश्यक दाखले उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच शेतकऱ्यांच्या जमिनी संदर्भातील फेरफार, वारस नोंदी आणि ७/१२ दुरुस्तीसाठी जागेवरच कार्यवाही केली जाणार आहे. संजय गांधी निराधार व श्रावण बाळ योजनांच्या लाभार्थ्यांनाही आवश्यक मार्गदर्शन व मदत मिळणार आहे. 'सिंगल विंडो क्लिअरन्स' प्रणालीमुळे कागदपत्रांची पडताळणी आणि मंजुरी एकाच ठिकाणी होणार आहे. डिजिटल ७/१२ संदर्भात जनजागृती आणि प्रात्यक्षिकेही आयोजित करण्यात आली आहेत. घरकुल लाभार्थ्यांना प्रलंबित पट्टे वाटप, तसेच पाणंद रस्त्यांच्या कामांसाठी प्रशासकीय मान्यताही दिल्या जाणार आहेत. महसूल प्रशासन आणि नागरिकांतील अंतर कमी करून लोकांना तातडीने न्याय देणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# बारामती न.पा.च्या इमारतीतील शौचालयांची दयनीय अवस्था

## नागरिकांमध्ये तीव्र संताप

**बारामती शहर : हॅलो प्रभात**

केदार पाटोळे



विकासाचे आदर्श मॉडेल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बारामती शहरातील नगर परिषद मुख्य इमारतीमधील शौचालयांची अत्यंत दयनीय अवस्था समोर आली असून, यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. नगर परिषद कार्यालयात दररोज शेकडो नागरिक विविध प्रशासकीय कामांसाठी ये-जा करत असतात. मात्र, इमारतीच्या प्रवेशकरण्या पूर्वीच असलेल्या शौचालयांची जी अवस्था आहे, ती अत्यंत चिंताजनक आहे. अस्वच्छता, तुटलेली भांडी, मोडकळीस आलेले दरवाजे, तसेच फुटलेल्या खिडक्या यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींना या परिस्थितीचा अधिक त्रास सहन करावा लागत असून, त्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेवर याचा गंभीर परिणाम होत आहे. स्वच्छतेच्या अभावामुळे संसर्गजन्य आजारांचा धोका वाढण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. याहून गंभीर बाब म्हणजे, नगर प्रशासनाच्या मुख्य इमारतीतच मूलभूत सुविधा योग्य स्थितीत उपलब्ध नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचे समोर येत आहे.




> बारामती नगर परिषद मुख्य इमारतीसमोरील सार्वजनिक शौचालयांची जी अत्यंत दयनीय अवस्था आज पाहायला मिळत आहे, ती केवळ दुर्लक्ष नसून प्रशासनाच्या अपयशाचे जिवंत उदाहरण आहे. नागरिकांकडून कर वसूल केला जातो, मात्र त्याबदल्यात मूलभूत सुविधा सुद्धा पुरवल्या जात नाहीत, ही अत्यंत खेदजनक बाब आहे. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणीच स्वच्छता, सुरक्षितता आणि देखभाल यांचा पूर्ण अभाव दिसून येतो, यावरून प्रशासनाचे नियोजन आणि कार्यक्षमता किती ढासळली आहे हे स्पष्ट होते.,यावेळी त्या म्हणाल्या की,मी विरोधी पक्ष नेते म्हणून प्रशासनाला विनंती करते की संबंधित शौचालयांची तात्काळ डागडुजी ,दुरुस्ती व स्वच्छता करण्यात यावी. नियमित देखभाल करण्यासाठी जबाबदार ठेकेदारास सूचित करावे अशी विनंती मी मुख्याधिकारी यांच्याकडे करणार आहे.
>
> **- आरती शेंडगे, विरोधी पक्ष नेते**

# जिजामाता विद्यालयाचे दिमाखदार यश

**पुरंदर : हॅलो प्रभात**

एन.एम. एम. एस परीक्षेत ३ विद्यार्थ्यांची केंद्र शासन शिष्यवृत्तीसाठी निवड



महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद आयोजित राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा (एन.एम.एम.एस)दिनांक 28 डिसेंबर 2025 रोजी घेण्यात आली होती. या परीक्षेची अंतिम निवड यादी नुकतीच जाहीर झाली असून जेजुरी येथील जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजने पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तेची छाप पाडली आहे. या परीक्षेत विद्यालयातील तब्बल 37 विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यापैकी 3 विद्यार्थ्यांची प्रत्येकी 48,000 रुपयांच्या केंद्र शासनाच्या प्रतिष्ठित शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे. विशेष म्हणजे भगत केतन राजेंद्र याने पुरंदर तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावून विद्यालयाचा मान उंचावला आहे. केंद्र शासन शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी -भगत केतन राजेंद्र (तालुक्यात प्रथम), पुशाम अवंती मुकेशकुमार, बर्गे प्रज्वल संजीत या यशामागे विद्यालयाचे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य मा. नंदकुमार सागर, पर्यवेक्षिका लीना पायगुडे, समन्वयक प्रल्हाद गिरमे, माध्यमिक विभाग प्रमुख बाळासाहेब जगताप, शिष्यवृत्ती विभाग प्रमुख पांडुरंग आटोळे तसेच शिक्षकवृंद सारिका कामथे, सागर चव्हाण आणि वर्षा देसाई यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

तसेच संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, पश्चिम महाराष्ट्र भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस, संस्थेचे सचिव, माजी आमदार संजयजी चंदूकाका जगताप, संस्थेचे प्रमुख सल्लागार व आय ए.एस अधिकारी डॉ. राजेंद्रबापू जगताप, संस्थापक सचिव डॉ. एम. एस. जाधव, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा व संस्थेच्या विश्वस्त राजवर्धिनीताई जगताप, भारती विद्यापीठाच्या संचालिका व संस्थेच्या विश्वस्त अस्मिता ताई जगताप, सहसचिव दत्तात्रय गवळी,संस्थेच्या समन्वयिका सोनालीताई शिंदे, व्यवस्थापक कानिफनाथ आमराळे, रवींद्रपंत जगताप व इतर मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

# हर्षद जाधव यांची आमदार प्रतिनिधीपदी नियुक्ती

**पुणे : हॅलो प्रभात**



येथील आशिया खंडातील अग्रगण्य म्हणून ओळख असलेल्या येरवडा मनोरुग्णालयाच्या प्रादेशिक समितीवर आमदार प्रतिनिधी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे वडगाव शेरी विधानसभा अध्यक्ष हर्षद जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती वडगाव शेरी मतदारसंघाचे आमदार बापूसाहेब पठारे तसेच मनोरुग्णालयाचे अधीक्षक डॉ. श्रीनिवास कोलोड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. जाधव यांच्या नियुक्तीचे पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून स्वागत करण्यात आले असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. नियुक्तीनंतर बोलताना हर्षद जाधव यांनी मनोरुग्णालयातील रुग्णांच्या प्राथमिक समस्या सोडविण्यास प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. तसेच रुग्णांना आवश्यक सुविधा आणि उपचार अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

# विद्येच्या माहेरघरातच अल्पवयीन मुली असुरक्षित ?

**पुणे : हॅलो प्रभात**

सोमनाथ साळुंके

■ नराधमांच्या वासनेच्या बनताहेत शिकार

■ महिला पाठोपाठ चिमुकल्यांची देखील सुरक्षा रामभरोसे



विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहरात सध्या निष्पाप जीव हे विकृत बुद्धीच्या नराधमांच्या वासनेच्या शिकार बनत असून ऐतिहासिक वारसा जपण्याच्या शहरातील तालुक्याच्या ठिकाणी एकाच आठवड्यात एक नव्हे तर पाच अत्याचाराच्या घटनेने खळबळ उडाली आहे.त्यामुळे महिला पाठोपाठ अल्पवयीन मुलींची सुरक्षा देखील रामभरोसे राहिल्याचे स्पष्ट होत आहे. यापूर्वी अंदाजे दहा वर्षापूर्वी खराडी भागातील आयटीपार्कमध्ये नोकरी करणाऱ्या दिवंगत नयना पुजारी ही महिला देखील विकृत बुद्धीच्या नराधमांची शिकार बनून तिला जीव गमविण्याची वेळ आली होती.संबंधित घटना शांत होत नाही.तोच मागील वर्षी बदलापूर, सातारा,कोल्हापूर,नाशिक अशा विविध जिल्ह्यांनी नराधमांनी आता असलेला मोर्चा महिलांकडे नाही तर ज्या चिमुकल्यांची कळी जग पाहण्याचे स्वप्न बाळगत असतानाच त्या नराधमांच्या वासनेच्या शिकार होऊन निष्पाप जीव हे जगाचा निरोप घेत आहेत.त्यामुळे यासारखी दुसरी शोकांतिका असू शकत नाही.

सातारा,बदलापूर भागातील घटना शांत होत नाही.तोच अशा नराधमांनी आता डोके वर काढून मागील आठवड्यात भोर तालुक्यातील नसरापूर भागात नाती समान असलेल्या चिमुकलीला खाऊचे आमिष दाखवून तिच्यावर भीमराव कांबळे या नराधमाने अत्याचार करून खून केल्याचा प्रकार उघडकीस आल्याने झालेल्या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्राला हादरा बसून याचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात उमटत आहे.संबंधित नराधमास कठोर शिक्षा व्हावी या उद्देशाने आंदोलने छेडली जात आहे.यापूर्वी देखील या नराधमाने आपल्या पुतनीवर अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याने तो कारागृहातून नुकताच जामिनावर सुटून आला होता.ज्यावेळेस नराधमाच्या अत्याचाराची शिकार बनलेल्या निष्पाप जीवास त्यावेळेस काय?वेदना होत असतील हे नराधमाच्या अत्याचाराला बळी पडलेल्या निष्पाप चिमुकलीलाच माहिती त्यामुळे अशा नराधमांना कठोर शिक्षा होणे गरजेचे आहे.

या घटनेला काही तास उलटत नाही,तोच जिल्ह्यातील खेड तालुक्यातील चाकण सारख्या शहरात एका युवकावर नैसर्गिक अत्याचार करून त्याचा खून करण्यात आल्याच्या घटनेने चाकण शहरातील नागरिकात संताप व्यक्त करण्यात येत आहे.याबरोबरच बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात देखील आजोबाने देखील पोटच्या नातीवर अत्याचाराच्या घटनेने बीड शहरात प्रशासनाच्या विरोधात संतापाची लाट उसळली आहे.झालेल्या अत्याचाराच्या घटनेला अजून आठवडा देखील उलटत नाही. तोच पुणे तेथे काय उणे ही म्हणीने नावारूपास आलेल्या शहरात पुन्हा एकदा पर्वती भागातील दत्तवाडी परिसरात पोटच्या मुलीच्या मुलीवर आजोबाने अत्याचार करण्याचा प्रयत्न केला असतानाच जवळील राहणाऱ्या नागरिकामुळे प्रकार उघडकीस असल्याने अशा नराधमापासून एका निष्पाप जीवाचे प्राण वाचले.

ही घटना ताजी असतानाच मुळशी तालुक्यातील एका मतीमंद मुलीवर आइस्क्रीम विक्रीत्यानेच तिचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला.मात्र मतीमंद मुलीने आरडाओरड केल्यामुळे तिची वासनेच्या आहारी गेलेल्या नराधमाची शिकार होण्यापूर्वीच प्राण वाचले.तर श्री क्षेत्र थेऊर या ठिकाणी बेचाळीस वर्षीय नराधमाने घराजवळ राहणाऱ्या सहा वर्षीय अल्पवयीन मुलीचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला.या सर्व घटना घडत असताना वासनेच्या आहारी गेलेल्या नराधमांना चिमुकलीच्या जीवाबाबत थोडीशी देखील माया येत नाही.ही आपल्या राज्याची शोकांतिका आहे. एकाच आठवड्यात अत्याचाराच्या पाच घटना राज्यात नाही तर ऐतिहासिक वारसा जपणाऱ्या व विद्येचे माहेरघर असलेल्या शहरात घडल्याने संपूर्ण पुणे नाही तर राज्यातील समाज बांधव सुन्न झाला आहे. त्यामुळे भविष्यात अशा गंभीर स्वरूपातील अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी राज्यकर्त्यांच्या वतीने कायद्यात बदल होण्यासाठी आवाज उठविण्याची गरज आहे.त्यातच राज्य शासनाच्या वतीने समाजात जनजागृती करून मुली जगवा,मुली वाचवा या उपक्रमासाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात येत आहे.

मात्र घडलेल्या घटनेमुळे करण्यात येत असलेला खर्च हा अत्याचाराच्या वाढत्या घटनेमुळे पाण्यात गेले असल्याची म्हणण्याची वेळ नागरिकांवर येऊन महिला बरोबरच अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेसाठी उपाय योजना करणे ही काळाची गरज असून नाही तर येणाऱ्या भविष्यकाळात अजून किती निष्पाप जीव हे नराधमांच्या वासनेच्या शिकार बनणार हे सांगणे कठीण असून आता राज्यकर्त्यांना नाही तर समाजालाच कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा हा सवाल आता उपस्थित करण्याची वेळ आली आहे.

# मे अखेरपर्यंत नाले सफाई पूर्ण करा : जिल्हाधिकारी

कोल्हापूर : हॅलो प्रभात

जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी मे अखेरपर्यंत नाले सफाईची कामे पूर्ण करून प्रशासनाला तसे प्रमाणपत्र सादर करावे. तसेच, संभाव्य पूरबाधित गावांतील नागरिकांसाठी निश्चित केलेल्या निवारागृहांमध्ये पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि स्नागृहांच्या सुविधा सज्ज ठेवाव्यात. ऐनवेळी धावपळ करण्यापेक्षा वेळेत नियोजन करा, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील राजर्षी शाहूजी सभागृहात आयोजित मान्सूनपूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते. जिल्ह्यातील आणि लगतच्या जिल्ह्यातील सर्व धरणांमधील यंत्रणेचा समन्वय, पूरस्थितीमध्ये कोणत्याही परिस्थितीत जीवितहानी होता कामा नये, हाच प्रशासनाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.



जिल्हास्तरीय मान्सूनपूर्व आढावा बैठक

या बैठकीला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी, पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता अभिजीत म्हेत्रे, कार्यकारी अभियंता स्मिता माने, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समन्वयक प्रसाद संकपाळ यांच्यासह सर्व आस्थापनांचे विभागप्रमुख उपस्थित होते. तसेच जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी आणि मुख्याधिकारी ऑनलाइन सहभागी झाले होते. यावेळी कोल्हापूर व इचलकरंजी महापालिकेच्या तयारीसह प्रत्येक विभागाचा विस्तृत आढावा घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी संभाव्य पूरबाधित गावांमध्ये १०० टक्के 'उद्घोषणा यंत्रणा' बसवण्याचे आदेश दिले. जिल्हाधिकाऱ्यांनी सूचना देताना सांगितले की, धोकादायक शाळा आणि अंगणवाड्यांच्या इमारती निश्चित करून तातडीने उपाययोजना कराव्यात. जिल्हा परिषदेने सर्व शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट पूर्ण करावे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी धोकादायक इमारती व झाडांबाबत विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून कडक कारवाई करणे आवश्यक आहे. कुठेही अपघात होता कामा नये. तसेच मान्सूनच्या कालावधीत कोणत्याही अधिकारी वा कर्मचाऱ्याला मुख्यालय सोडता येणार नाही अथवा सुट्ट्या घेता येणार नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग विभागाने रस्ते दुरुस्ती, लगतची धोकादायक झाडे-फांद्या काढणे आणि बाधित होणाऱ्या रस्त्यांसाठी पर्यायी मार्गांची डागडुजी मे अखेरपर्यंत पूर्ण करावी. ग्रामीण व शहरी भागातील स्थलांतरित होणाऱ्या कुटुंबांना कोणत्या निवारागृहात जायचे आहे, याची पूर्वकल्पना देऊन मार्गदर्शक सूचना द्याव्यात, असेही त्यांनी नमूद केले.

## डायनॅमिक स्पोर्ट्सच्या श्रध्दा धुमाळ हिची निवड

इचलकरंजी : हॅलो प्रभात



नागपूर येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज चषक कबड्डी स्पर्धेसाठी खुल्या महिला गटात येथील डायनॅमिक स्पोर्टस् क्लबच्या कु. श्रध्दा अनिल धुमाळ हिची निवड झाली आहे. कु. श्रध्दा धुमाळ हिने आतापर्यंत विविध स्पर्धांमध्ये सातत्याने चमकदार कामगिरी केली आहे. तिच्या या कामगिरीची दखल घेऊन तिची या स्पर्धेसाठी राज्य संघात निवड झाली आहे. तिला प्रशिक्षक शेखर शहा यांचे मार्गदर्शन आणि डायनॅमिक स्पोर्टस क्लबचे अध्यक्ष संजय कुडचे, भूषण शहा, अतुल बुगड, मोहसीन बागवान यांचे प्रोत्साहन लाभत आहे.

## शाहू स्मारक भवन येथे निसर्गचित्र प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

कोल्हापूर : हॅलो प्रभात

शाहू स्मारक भवन येथील कलादालनात ओल्ड इज् गोल्ड चित्रकार ग्रुपच्या सदस्यांचे निसर्गचित्र व रचनाचित्र प्रदर्शन उत्साहात सुरू झाले असून रसिकांकडून प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. चित्रकार अशोक धर्माधिकारी, अरुण सुतार आणि शिवाजी काटकर यांच्या विविध शैलीतील कलाकृती या प्रदर्शनात मांडण्यात आल्या आहेत. प्रदर्शनाचे उद्घाटन क्रिडाई महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष तथा माजी अध्यक्ष विद्यानंद बेडेकर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी रवींद्र उबेरॉय होते. यावेळी अरुण नरके यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रदर्शनामध्ये निसर्गचित्र, रचनाचित्र, पेन्सिल स्केच, व्यक्तीचित्र आदी विविध कलाकृतींचा समावेश असून रसिकांचे विशेष लक्ष वेधले जात आहे. ज्येष्ठ चित्रकार अशोक धर्माधिकारी हे वयाच्या ८१ व्या वर्षीही सातत्याने चित्रकलेची साधना करत असून त्यांच्या १५ रचनाचित्रांचा समावेश प्रदर्शनात करण्यात आला आहे.



चित्रकार अरुण सुतार यांच्या व्यक्तीचित्रांना विशेष पसंती मिळत असून त्यांनी यापूर्वी अनेक शहरांत प्रदर्शने भरविली आहेत. तसेच शिवाजी काटकर यांनी कोणतेही औपचारिक शिक्षण नसतानाही पेन्सिल शेडिंग व निसर्गचित्रांमध्ये वेगळी ओळख निर्माण केली आहे. हे प्रदर्शन ११ मे २०२६ पर्यंत दररोज सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे.

## दुधगावात श्री दुधेश्वर मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा

दुधगाव : हॅलो प्रभात




येथील श्री दुधेश्वर मंदिराच्या वास्तुशांती, प्राणप्रतिष्ठा व कळसारोहण सोहळ्याचे आयोजन दि. ८ मे ते १० मे २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे. या निमित्ताने गावात धार्मिक वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या भव्य सोहळ्यास जगद्गुरू श्री श्री विद्यानृसिंह भारती शंकराचार्य यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असल्याने कार्यक्रमाचे विशेष महत्त्व वाढले आहे. त्यांच्या सान्निध्यात विविध धार्मिक विधी संपन्न होणार आहेत.


दि. ८ मे रोजी रथ, घोडे व बँडसह भव्य कलश मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले असून या मिरवणुकीत मोठ्या संख्येने ग्रामस्थ व भाविक सहभागी होणार आहेत. गावातील प्रमुख मार्गांवरून ही मिरवणूक पार पडणार असून उत्सवाची रंगत वाढणार आहे. दि. ९ मे रोजी सकाळी विविध धार्मिक विधी पार पडणार असून त्यामध्ये कलश धान्यादिवासातून बाहेर काढणे, जलादिवास मर्यादा, होम-हवन, जलादिवासातून बाहेर काढणे तसेच कलशास विविध प्रकारचे स्नान घालण्याचे विधी होणार आहेत. रात्री ८ वाजता युवा कीर्तनकार समाजप्रबोधनकार नेहताई अर्जुन महाराज साळेकर भोसले (पुणे) यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे.दि. १० मे रोजी सकाळी तत्त्वन्यास होम, शोडस्तकला स्थापना, प्राणप्रतिष्ठा, बली व पूर्णाहुती हे प्रमुख धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत. याच दिवशी जगद्गुरू श्री श्री विद्यानृसिंह भारती शंकराचार्य यांचे आगमन व पाद्यपूजा होणार आहे. त्यानंतर कलश पूजन, दुपारी १२.३० वाजता कलश स्थापना, महाआरती व नैवेद्य होणार असून दुपारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री ८ वाजता ह.भ.प. कीर्तनकार शिवलीलाताई पाटील यांचे कीर्तन होणार आहे. मंदिराच्या जीर्णोद्धारानंतर प्रथमच हा सोहळा पार पडत असून, तीन दिवस विविध धार्मिक विधी, पूजापाठ, होमहवन, अभिषेक, कीर्तन व भजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. श्री दुधेश्वर देवस्थान ट्रस्ट व उत्सव समितीच्या वतीने कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले असून सर्व भाविकांनी उपस्थित राहून दर्शन व पुण्यलाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## कडेगांव नगरपंचायत इमारतीसाठी ५ कोटीचा निधी

### संग्रामसिंह देशमुख यांचे विशेष प्रयत्न

कडेगाव : हॅलो प्रभात

हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक म्हणून देशभर नावलौकिक असलेल्या कडेगाव शहरातील नागरिकांना अधिक सक्षम सुविधा मिळण्यासाठी व शहराच्या विकासाला नवी दिशा मिळावी यासाठी नगरपंचायततीच्या प्रशस्त इमारत बांधकामासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री, एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास खात्याकडे पाठपुरावा केला होता. केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून दि.५ में रोजी नगर विकास मंत्रालयामार्फत इमारतीच्या निधी संदर्भातील शुद्धिपत्रक जाहीर करण्यात आले असून कडेगाव नगरपंचायतीच्या नवीन प्रशस्त इमारत बांधकामासाठी ५ कोटीचा निधी मंजूर करण्यात आल्याची माहिती सांगली जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष व भाजपाचे पलूस कडेगांव विधानसभा प्रमुख संग्रामसिंह देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.



पुढे बोलताना ते म्हणाले की कडेगाव शहरवासीयांनी तात्कालीन महाविकास आघाडी सरकार सत्तेत असताना भाजपा सरकारवर विश्वास ठेवत व भाजपच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी केलेल्या कठोर परिश्रम व लोकसेवेच्या जोरावर मोठ्या विश्वासाने सत्ता आमच्याकडे दीली असल्याने शहरातील अनेक प्रलंबित विकास कामांना कोट्यावधीचा निधी या आधी मिळाला आहे. जिल्ह्यातील शिवसेनेचे नेते डब्बल महाराष्ट्र केसरी पै. चंद्रहार पाटील यांचे विशेष सहकार्य या निधीसाठी मिळाले असून कडेगाव नगरपंचायतीच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपा-महायुती सरकारने कडेगावकरांना मोठी भेट दिली असून यापुढेही केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्याकडून लागेल तितका निधी मंजूर करून आणणार असल्याचे संग्राम देशमुख यांनी सांगितले.



## विशाल पाटील यांची मानद वन्यजीव रक्षकपदी नियुक्ती

ईश्वरपूर : हॅलो प्रभात

येथील आविष्कार कल्चरल ग्रुपचे युवा सदस्य विशाल विरसेन पाटील यांची महाराष्ट्र शासनाच्या वतीने मानद 'वन्य जीव रक्षक' सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीबद्दल आविष्कार कल्चरल ग्रुपच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात आविष्कारचे अध्यक्ष प्रा. कृष्णा मंडले आणि मजूर फेडरेशनचे संचालक संतोष पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख मार्गदर्शक मोहन चव्हाण, माजी कार्याध्यक्ष प्रा. प्रदीप पाटील, कार्याध्यक्ष भूषण शहा, माजी अध्यक्ष सतीश पाटील, सुनिल चव्हाण आणि माजी उपाध्यक्ष राजवर्धन लाड उपस्थित होते. महसूल व वन विभागाच्या वतीने राज्यातील १८ जिल्ह्यांमधून ३४ सदस्यांची यादी जाहीर करण्यात आली असून सांगली जिल्ह्यातून विशाल पाटील आणि प्रा. कांचन सुतार यांची निवड करण्यात आली आहे. हे स्वयंसेवी स्वरूपाचे निमशासकीय पद असून वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत या सदस्यांना विशेष अधिकार देण्यात आले आहेत. वन्यजीवांवरील गुन्हे रोखणे, जनजागृती करणे आणि संरक्षणाबाबत कार्य करणे ही जबाबदारी त्यांच्यावर असणार आहे. यावेळी विश्वनाथ पाटसुते, विजय लाड, विश्वास कदम, अक्षय जाधव, प्रताप पाटील, सचिन शिंगटे यांच्यासह आविष्कारचे सदस्य उपस्थित होते.

## ऊस पिकासाठी ५ फुटावर सरी लागण फायद्याची : विलास जाधव

देवराष्ट्रे : हॅलो प्रभात

ऊस पिकासाठी ५ फुटावर सरी काढून लागण करणेचा पर्याय अधिक फायद्याचा असलेचे मत क्रांती अग्रणी डॉ जी डी बापू लाड सहकारी साखर कारखान्याचे ऊस विकास अधिकारी विलास जाधव यांनी व्यक्त केले. चिंचणी तालुका कडेगाव येथील कारखान्यामार्फत आयोजित शेतकरी चर्चासत्रात ते बोलत होत.अध्यक्षस्थानी संचालक वैभव पवार हे होत.

ते पुढे म्हणाले, "ऊसामध्ये अन्न तयार करणेसाठी सूर्यप्रकाशाचा उपयोग करून घेणेची नैसर्गिक क्षमता मोठी आहे. सरीतील अंतर पाच फुटावर वाढविल्यामुळे पिकाच्या सर्व पानांवर मुबलक सूर्यप्रकाश मिळतो, पिकात हवा खेळती राहते त्यामुळे उसाची जोमदार वाढ होते. जमिनीचा कार्यक्षम वापर झाल्यामुळे पिकाला अन्न पुरवठा करणेचे जमिनीवरील दडपण कमी होते असे सांगून ते पुढे म्हणाले कि, ऊस लागणीचा नवीन हंगाम एक जून पासून सुरू होत आहे या हंगामात लागण करणाऱ्या शेतकऱ्यांनी पाच फुटावर सरी व दीड फुटावर एक डोळा टिपरी किंवा ऊस रोप या पद्धतीने लागण केलेस अपेक्षित एकरी उत्पादनापर्यंत पोहोचता येणे शक्य आहे तसेच या पद्धतीमध्ये ऊस लागवड खर्चात ही बचत होणार आहे. शेतकऱ्यांनी कारखान्याच्या ऊस विकास कार्यक्रमात सहभागी होऊन आपल्या उसाचे एकरी उत्पादन वाढवावे असे आवाहन त्यांनी केले .

यावेळी उत्तमराव माने, हिंदुराव माने, जितेंद्र पाटील,नानासो माळी, जगन्नाथ आडके, राहुल पाटील, बबन पाटील, अरुण माळी, आनंदराव माने, जयवंत पाटील यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.कार्यक्रमाचे स्वागत प्रास्ताविक ओंकार जाधव आभार वैभव पवार यांनी मानले.

## शिवप्रसादची ग्रामीण क्रांती

### शेतकरी समृद्धी आणि महिला सक्षमीकरणाला नवी दिशा

नातेपुते : हॅलो प्रभात

कण्हेर येथे शेतकरी आणि महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या दुहेरी उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शेतकरी बांधवांसाठी जनहित जागर मेळावा आणि महिलांसाठी होम मिनिस्टर,खेळ पैठणीचा या कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले होते.

हा उपक्रम शिवप्रसाद उद्योग समूह यांच्या वतीने पार पडला. कार्यक्रमाचे निमंत्रक म्हणून शिवप्रसाद सेंटरचे चालक राहुल माने, नामदेव माने, उद्धव माने, अजित पवार, बाळासाहेब गोसावी आणि बंडू माने यांनी यशस्वीपणे नियोजनाची धुरा सांभाळली




कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून शिवप्रसाद उद्योग समूहाचे अध्यक्ष शरद बापू मोरे उपस्थित होते. त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना दुग्ध व्यवसाय मजबूत करण्यावर भर दिला. तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

या मेळाव्यात शेतकऱ्यांना आधुनिक शेती, दुग्ध व्यवसाय आणि आर्थिक सक्षमीकरण याबाबत माहिती देण्यात आली. दुसरीकडे महिलांसाठी आयोजित "खेळ पैठणीचा" या स्पर्धात्मक कार्यक्रमाने उत्साहाचे वातावरण निर्माण केले. यावेळी बाळासाहेब सरगर, रमेश पाटील, संभाजी माने, तात्यासो माने, आदिनाथ पाटील, अशोक ठवरे, पोपट माने, बाजीराव माने, नितीन पाटील हे मान्यवर तसेच ग्रामस्थ महिला पुरुष उपस्थित होते.

## एच.पी.गॅस.एजन्सीकडून ग्राहकांची गैरसोय

देवराष्ट्रे : संदेश जाधव




कडेगाव तालुक्यातील चिंचणी येथील एचपी गॅस एजन्सीअंतर्गत येणाऱ्या ग्राहकांना गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात गॅस सिलेंडरच्या तीव्र तुटवड्याला सामोरे जावे लागत आहे. तालुक्यातील अनेक नागरिकांना वेळेवर गॅस उपलब्ध होत नसल्यामुळे त्यांच्या दैनंदिन जीवनावर मोठा परिणाम होत आहे.

सदर एजन्सीअंतर्गत ग्राहकांची संख्या मोठ्या प्रमाणात असताना देखील गॅस सिलेंडरचा पुरवठा अत्यंत अपुरा होत असल्याचे चित्र आहे. परिणामी ग्राहकांना नियमानुसार ओटीपी येऊन सुद्धा गॅस वेळेवर उपलब्ध होत नाही. ग्राहकांना भर उन्हामध्ये एजन्सी समोर गर्दी करावी लागत आहे. त्यामुळे ग्राहकांची मोठी गैरसोय होत आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित विभागाने तातडीने हस्तक्षेप करून गॅस पुरवठा सुरळीत करावा व वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करून नागरिकांना नियमित व सुरळीत सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी मनसेच्या वतीने करण्यात आली. प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तात्काळ व गांभीर्याने लक्ष द्यावे असे लेखी निवेदन जिल्हा पुरवठा निरीक्षक स्वप्नील फडतरे यांना देण्यात आले. यावेळी अजय शिंदे,संदीप मोहिते यांच्यासह मनसे कार्यकर्ते उपस्थित होते.

## यशदा येथे जिल्हा परिषद सदस्यांचे विशेष प्रशिक्षण

शिराळा : हॅलो प्रभात

यशदा येथे राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत ४ ते ६ मे २०२६ दरम्यान जिल्हा परिषद सदस्यांसाठी तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणात कोल्हापूर, सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांतील सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

प्रशिक्षणादरम्यान पंचायत राज व्यवस्थेचे कार्य, जिल्हा नियोजन समितीची भूमिका, विविध विकास आराखडे, शासनाच्या योजना तसेच आर्थिक व प्रशासकीय विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच नेतृत्व विकास, प्रभावी संवाद कौशल्य, समन्वय आणि आधुनिक तंत्रज्ञानासह कृत्रिम बुद्धिमत्ता वापराबाबतही विशेष माहिती देण्यात आली.

सांगली जिल्ह्याचे युवा जिल्हा परिषद सदस्य विराज मानसिंग नाईक यांनी प्रशिक्षणातील चर्चासत्रे, गटकार्य आणि



संवाद सत्रांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. प्रशिक्षणातून मिळालेल्या अनुभवाचा उपयोग मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी करणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमात यशदा चे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड, उप महासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, प्रकल्प उपसंचालक आनंद पुसाळे, शरद बुट्टे पाटील आणि नरसिंह मित्रगोत्री यांच्यासह विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले. समारोपावेळी सहभागी सदस्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

## आदर्श इन्स्टिट्यूटमध्ये सायबर सुरक्षेवरील ऑनलाईन व्याख्यान संपन्न

विटा : हॅलो प्रभात

लोकनेते हनमंतराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट संचालित आदर्श इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च सेंटर, विटा येथील जनरल सायन्सेस अँड इंजिनिअरिंग विभागामार्फत प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी 'सायबर सुरक्षेचे महत्त्व' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले. या उपक्रमात सुमारे १०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.सदर व्याख्यान तज्ज्ञ मार्गदर्शक दिनेश कुडचे यांनी ऑनलाईन माध्यमातून घेतले. वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानात सायबर धोके, माहिती संरक्षण, सुरक्षित डिजिटल व्यवहार याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.आजच्या डिजिटल युगात



सायबर सुरक्षेचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन विविध प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. तसेच ऑनलाईन व्यवहार करताना घ्यावयाची काळजी, माहिती सुरक्षेची मूलभूत तत्त्वे आणि सायबर हल्ल्यांपासून बचावाचे उपाय यावरही मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सत्रात सक्रिय सहभाग घेत सायबर सुरक्षेबाबत उपयुक्त माहिती आत्मसात केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची डिजिटल सुरक्षिततेबाबत जागरूकता वाढण्यास मदत झाली. संस्थेचे अध्यक्ष ॲड. वैभव पाटील, कार्यकारी संचालक पी.टी.पाटील व आर्थिक संचालक रवीराज सूर्यवंशी यांनी उपक्रमास शुभेच्छा दिल्या. कॅम्पस डायरेक्टर कु.पूजा पाटील व प्राचार्य डॉ.पी.एस. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे आयोजन विभागप्रमुख प्रा. एच. एस. भोरे यांनी केले असून समन्वयन व आभार प्रदर्शन डॉ.आर.पी.निकम यांनी केले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांचे मुंबई येथून प्रयाण

**मुंबई : हॅलो प्रभात**

व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम व त्यांचे शिष्टमंडळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथून विमानाने रात्री ०८.३० वाजता प्रयाण केले. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, मुख्य सचिव राजेश अग्रवाल तसेच व्हिएतनामचे उच्चस्तरीय अधिकारी उपस्थित होते.



### भारत-व्हिएतनाम संबंध अधिक दृढ करण्यासाठी कटिबद्ध – मुख्यमंत्री

**मुंबई : हॅलो प्रभात**

भारत आणि व्हिएतनाम यांच्यातील संबंध अधिक बळकट करण्यासाठी महाराष्ट्र विश्वासार्ह भागीदार म्हणून कार्य करण्यास सज्ज आहे. व्हिएतनाम सोबत सांस्कृतिक, आर्थिक आणि परस्पर संबंध अधिक दृढ करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांच्या एक दिवसीय मुंबई भेटीदरम्यान आयोजित इंडिया-व्हिएतनाम बिझनेस फोरमला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबोधित केले. यावेळी त्यांनी व्हिएतनामच्या उद्योजकांना गुंतवणुकीसाठी राज्यात येण्याचे आवाहन केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारत आणि व्हिएतनाम भागीदारी अधिक दृढ होऊन 'एन्हान्स्ड कॉम्प्रेहेन्सिव्ह स्ट्रेटेजिक पार्टनरशिप' नव्या स्तरावर नेल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांचे अभिनंदन केले. महाराष्ट्रातील बौद्ध धर्माचा समृद्ध वारसा सांगताना मुख्यमंत्र्यांनी नागपूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्म स्वीकारुन त्याला आधुनिक काळात मिळवून दिलेल्या अधिष्ठानाचा परिचय दिला. तसेच युनेस्को जागतिक वारसा स्थळ असलेली अजिंठा आणि वेरुळ येथील बौद्ध आणि जैन लेणी येथे व्हिएतनामच्या गुंतवणुकदारांचे स्वागत केले. छत्रपती संभाजीनगर आणि हो चि मिन्ह सिटी यांच्यात थेट हवाई सेवा सुरू करण्यासह स्वतंत्र बौद्ध पर्यटन सर्किट विकसित करण्याचा प्रस्ताव त्यांनी यावेळी मांडला.

### मूठ गावाने मिळवला 'स्व-गणना' मोहिमेत सिंधुदुर्गात पहिला मान

**सिंधुदुर्गनगरी : हॅलो प्रभात**

स्व-गणना मोहिमेत वेंगुर्ला तालुक्यातील मूठ गावाने उल्लेखनीय कामगिरी करत सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. मूठ हे सर्व कुटुंबांची स्व-गणना पूर्ण करणारे जिल्ह्यातील पहिले महसुली गाव ठरले आहे. जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्थानिक पातळीवरील नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळे हा महत्वाचा टप्पा गाठण्यात प्रशासनाला यश आले आहे. मूठ गावात एकूण ३६ घरे आणि ४३ कुटुंबांचा समावेश असून, गावची लोकसंख्या १४४ आहे. गावातील सर्वच कुटुंबांनी स्वगणना प्रक्रिया पूर्ण केली. या यशामागे तहसीलदार ओंकार ओतारी यांचे सूक्ष्म नियोजन महत्त्वाचे ठरले. तसेच नायब तहसीलदार,मंडळ अधिकारी आणि सर्व तलाठी यांनी घेतलेल्या मेहनतीमुळे हे अभियान यशस्वी झाले. विशेष म्हणजे, स्थानिक नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला, ही बाब उल्लेखनीय ठरली. मूठ गावाची ही कामगिरी जिल्ह्यासाठी प्रेरणादायी ठरली असून प्रशासन आणि नागरिक यांच्यातील प्रभावी समन्वयामुळे कोणतेही उद्दिष्ट साध्य होऊ शकते, हे अधोरेखित झाले आहे. जिल्ह्यातील इतर गावांनीही मूठ गावचा आदर्श घेऊन स्वगणना प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी केले आहे.

### चौथी आणि सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेची अंतरिम उत्तरसूची प्रसिद्ध

**मुंबई : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत रविवार २६ एप्रिल, २०२६ रोजी प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. चौथी) आणि उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. सातवी) आयोजित करण्यात आली होती. या परीक्षेची इयत्तानिहाय, पेपरनिहाय अंतरिम (तात्पुरती) उत्तरसूची परिषदेच्या www.mscepune.in व https://puppssmsce.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत असल्याचे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी कळविले आहे. या अंतरिम उत्तरसूचीवर काही आक्षेप असल्यास त्याबाबतचे निवेदन परिषदेच्या संकेतस्थळावरुन ऑनलाईन स्वरूपात करता येईल. हे निवेदन पालकांकरिता संकेतस्थळावर व शाळांकरिता त्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

# ३,१०३ अधिकारी पदांसाठी ११ जूनला परीक्षा

## पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या पाठपुराव्याला यश

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदांमुळे ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय सेवांवर पडणारा ताण कमी करण्यासाठी या पदांच्या भरती प्रक्रियेला गती देण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा गट 'अ'च्या २ हजार ७९५ आणि सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन गट 'अ'च्या ३०८ पदांसाठी संगणक प्रणालीवर आधारित चाळणी परीक्षा घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे. ही परीक्षा ११ जून २०२६ रोजी मुंबई, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथे होणार आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने याबाबत प्रसिद्धीपत्रक जारी केले असून संबंधित उमेदवारांची परीक्षा सायंकाळी ५.३० ते ७ या वेळेत होणार असल्याचे नमूद केले आहे. परीक्षेतील गुणांच्या आधारे स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करण्यात येणार असून त्यानंतर पुढील निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.



राज्यातील पशुसंवर्धन विभागात मोठ्या प्रमाणावर अधिकारी रिक्त असल्याने पशुवैद्यकीय सेवा, पशुधन आरोग्य तपासणी, लसीकरण आणि ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना तातडीची मदत देण्यात अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. या निर्णयाबाबत आनंद व्यक्त करताना पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, खूप दिवस झाले आपण ज्या अत्यंत आनंदाच्या बातमीची प्रतीक्षा करत आहात, ती बातमी तुम्हा सर्वांना देण्यासाठी मला आनंद होत आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पशुधन विकास अधिकारी गट 'अ' या पदासाठी २७९५ तर सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन गट 'अ' या पदासाठी ३०८ जागांच्या परीक्षा घेण्याचा निर्णय झालेला आहे. ११ जून २०२६ रोजी ही परीक्षा आहे. एवढे सर्व अधिकारी पशुसंवर्धन खात्यात रुजू झाल्यानंतर विभागाच्या कामाला मोठा वेग मिळेल. ग्रामीण भागातील लोकांच्या आणि त्यांच्या पशुधनाची अधिक चांगली काळजी घेणे शक्य होईल." या भरतीमुळे राज्यातील पशुवैद्यकीय यंत्रणेला मोठे बळ मिळणार असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करून या परीक्षेला बसणाऱ्या सर्व परीक्षार्थींना मंत्री पंकजा मुंडे यांनी शुभेच्छा दिल्या.

## जहाजबांधणी प्रकल्पासाठी पायाभूत सुविधा उभाराव्यात

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्यातील जहाजबांधणी व सागरी पायाभूत सुविधा विकासाच्या दृष्टीने नांदगाव, दिघी आणि विजयदुर्ग या तीन संभाव्य स्थळांचा सविस्तर तांत्रिक व आर्थिक आढावा घेण्यात आला असून, सिंधुदुर्ग जिल्ह्यास प्राधान्य देत संबंधित स्थळांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण, पुनर्भरण, ट्रॅफिक लॉँचिंग तसेच सागरी पायाभूत सुविधांच्या नियोजनाबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले. जहाजबांधणी उद्योगात गुंतवणूक करू इच्छिणाऱ्या ऑपरेटर्सना प्राथमिक स्वरूपातील माहिती व अहवाल उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक नियोजन करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झाली. यावेळी जहाजबांधणी प्रकल्पासाठी संभाव्य स्थळांबाबत तांत्रिक क्षमता, समुद्रातील खोली, भूगर्भीय स्थिती, संपर्क व्यवस्था आणि भविष्यातील औद्योगिक संधी संदर्भात सविस्तर सादरीकरण करण्यात आले. बैठकीस महाराष्ट्र सागरी महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी प्रदीप, हस्कोनिंग कंपनीचे श्री जॉन सम्यूएल, श्री बिजापूर, तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## 'जनरेटिव्ह एआय' विषयावर विशेष तांत्रिक सत्र संपन्न

**मुंबई: हॅलो प्रभात**

चॅट जीपीटी, जेमिनी यांसारख्या एआय प्लॅटफॉर्मचा शासकीय पत्रव्यवहार, अहवाल तयार करणे, डेटा विश्लेषण आणि नागरिक सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी कसा उपयोग होत आहे, याची माहिती फ्रंटियर टेक्नॉलॉजी, नसकॉमचे संचालक एम. चोक्कालिंगम यांनी दिली. सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने मंत्रालय येथे टेक-वारी 2.0 अंतर्गत आर्टिफिशियल इंटेलिजन्स: हँड ऑन विथ जनरेटिव एआय या विषयावर विशेष तांत्रिक सत्राचे आयोजन मंत्रालयात करण्यात आले होते.



शासन व्यवस्था आणि सार्वजनिक प्रशासनामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) चे वाढते महत्त्व या सत्रात अधोरेखित करण्यात आले. प्रमुख वक्ते चोक्कालिंगम यांनी तमिळनाडू ई-गव्हर्नन्स एजन्सी आणि नॅसकॉम मधील आपल्या अनुभवांच्या आधारे शासनाच्या कामकाजात एआय तंत्रज्ञानामुळे कार्यक्षमता आणि सेवा वितरण कसे सुधारत आहे, याविषयी माहिती दिली.

सत्रादरम्यान सहभागी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग आणि जनरेटिव्ह एआय यांच्या मूलभूत संकल्पना सोप्या आणि व्यावहारिक उदाहरणांच्या माध्यमातून समजावून सांगण्यात आल्या. यावेळी एआय आधारित रिपोर्टिंग सिस्टीम, शासकीय योजनांसाठी चॅटबॉट सेवा तसेच आरोग्य क्षेत्रातील एआय-आधारित उपक्रमांची उदाहरणेही मांडण्यात आली. विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते आणि प्रशासनात AI च्या वापराबाबत त्यांनी उत्सुकता व्यक्त केली. सत्राच्या समारोपात वक्त्यांनी एआय हे मानवाचे पर्याय नसून मानवी कार्यक्षमता आणि निर्णयप्रक्रिया अधिक सक्षम करणारे प्रभावी साधन असल्याचे सांगितले. भविष्योन्मुख प्रशासनासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर ही काळाची गरज असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले.


## शेत/ पाणंद रस्त्यांना प्राधान्य देऊन ग्रामीण रोजगाराला गती द्यावी

### रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले

**मुंबई : हॅलो प्रभात**

रोजगार हमी योजना विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या मातोश्री ग्राम समृद्धी शेत/ पाणंद रस्त्यांच्या कामांना प्राधान्य देऊन तसेच या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करुन ग्रामीण रोजगाराला गती देण्याचे निर्देश रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी संबंधित यंत्रणांना दिले. ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती, शेतकऱ्यांना आवश्यक सुविधा आणि ग्रामविकासाला गती देण्याच्या दृष्टीने मंत्री भरत गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात विभागीय आढावा बैठक घेण्यात आली.

मंत्री भरत गोगावले यांनी विविध जिल्ह्यांतील रोजगार हमी योजनेच्या अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करत सध्या सुरू असलेल्या मनरेगा व मातोश्री ग्राम समृद्धी योजनेंतर्गत कामांचा जिल्हानिहाय आढावा घेतला. यामध्ये रोजगार हमी योजनेतील नोंदणीकृत मजुरांची संख्या, प्रत्यक्ष



सुरू असलेली कामे, प्रलंबित मंजुरी, निधी वापर, तसेच शेत/ पाणंद रस्त्यांच्या कामांबाबतची सद्यस्थिती यावर सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी बोलताना मंत्री भरत गोगावले म्हणाले, केंद्र शासनाने व्ही.बी.जी राम जी अधिनियम 2025 पारित केला असला तरी सदर अधिनियम अद्याप अंमलात आलेला नसून मनरेगा योजना पूर्ववत सुरू आहे. त्यामुळे विद्यमान कार्यपद्धतीनुसार सर्व कामे वेळेत आणि नियमबद्ध पद्धतीने पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच केंद्र शासनाकडून मनरेगा कामांसाठी कोणतीही अंतिम कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शेत/ पाणंद रस्त्यांची कामे ही राज्य शासनाची प्राधान्याची योजना असल्याचे सांगत मंत्री भरत गोगावले यांनी या कामांमध्ये अधिक गतिमानता आणण्याचे निर्देश दिले. ग्रामीण भागातील लोकप्रतिनिधी व ग्रामपंचायतींकडून प्राप्त झालेल्या मागण्या आणि स्थानिक गरजा लक्षात घेऊन शासनस्तरावर मोठ्या प्रमाणात शेत/ पाणंद रस्त्यांची कामे मंजूर करण्यात आली आहेत. क्षेत्रीय स्तरावर या कामांच्या अंमलबजावणीस गती द्यावी, असे त्यांनी सांगितले. मंजूर कामांची अंदाजपत्रके तातडीने तयार करून त्यांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात यावी तसेच संबंधित कामांचे वर्ककोड तत्काळ तयार करून कार्यारंभ आदेशासह हजेरीपत्रके निर्गमित करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. सुरू असलेल्या कामांची उर्वरित हजेरीपत्रके देखील त्वरित निर्गमित करून कामांचे मोजमाप घेऊन देयके नरेगासॉफ्ट प्रणालीवर विनाविलंब नोंदविण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. केंद्र शासनाने जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीने ग्रामपंचायत स्तरावर 20 पेक्षा अधिक कामे सुरू करण्याची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे शासनमान्य शेत/ पाणंद रस्त्यांच्या कामांना प्राधान्याने मंजुरी देण्याचे निर्देश मंत्री गोगावले यांनी दिले. संभाव्य 'एल निनो' परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करण्यासाठी शेत/ पाणंद रस्त्यांच्या कामांवर विशेष भर देण्याचेही त्यांनी सांगितले.

या बैठकीस रोजगार हमी योजना विभागाचे सचिव आप्पासाहेब धुळाज यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## शिक्षक भरती प्रक्रिया गतिमान करा – डॉ. पंकज भोयर

**मुंबई : हॅलो प्रभात**

शासकीय विद्यानिकेतनांतील सहाय्यक शिक्षकांची पदभरती 'पवित्र' प्रणालीमार्फत करण्यासाठी रोस्टर तपासणीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले. शासकीय विद्यानिकेतनांच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी विविध महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. बैठकीस शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल उपस्थित होते. तसेच दूरदृश्यप्रणालीद्वारे आयुक्त, संचालक, उपसंचालक, संबंधित अधिकारी आणि विद्यानिकेतनचे माजी विद्यार्थी सहभागी झाले होते. राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले की, राज्यात विद्यानिकेतनांच्या केवळ पाच शाळा कार्यरत असून, शिक्षक पदभरतीसंदर्भातील सर्व कार्यवाही पुढील पाच दिवसांत पूर्ण करण्यात यावी. 'पवित्र' पोर्टल ३१ मेपर्यंत सुरू असल्याने रोस्टर तपासणीसह इतर आवश्यक प्रक्रिया कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. विद्यानिकेतनांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासगट स्थापन करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. सध्या सुरू असलेल्या इयत्ता ६ वी ते १० वीच्या वर्गांसाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतर इयत्ता ११ वी व १२ वीचे वर्ग सुरू करण्याबाबत कार्यवाही करावी, असेही त्यांनी सांगितले. इयत्ता ६ वी तसेच पुढील वर्षांमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंदर्भातील अधिकार प्राचार्यांना देण्याबाबतही सकारात्मक भूमिका घेण्यात आली. शाळांची इमारत आणि वसतिगृहांची तपासणी करून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे अथवा नवीन इमारती उभारण्यासाठी सर्वसमावेशक प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.


# 'एआय उपयुक्त, पण मानवी भावना आणि सर्जनशीलतेला पर्याय नाही'

### 'टेक वारी 2.0' कार्यक्रमातील 'कलारंग : आर्ट, एआय अँड गव्हर्नन्स' परिसंवादात मान्यवरांचे मत

**मुंबई : हॅलो प्रभात**

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) ही कला, चित्रपटसृष्टी तसेच सर्वच क्षेत्रासाठी उपयुक्त तांत्रिक साधन असले, तरी मानवी भावना, संवेदना आणि सर्जनशीलतेची जागा ती कधीच घेऊ शकत नाही, असा सूर मंत्रालयात आयोजित 'टेक वारी 2.0' कार्यक्रमातील 'कलारंग : आर्ट, एआय अँड गव्हर्नन्स' या परिसंवादात उमटला. कला, चित्रपट आणि शिल्पकलेतील मान्यवरांनी एआयच्या वाढत्या प्रभावावर भाष्य करताना तंत्रज्ञानाचा वापर सजगतेने आणि विचारपूर्वक करण्याची गरज अधोरेखित केली.

सामान्य प्रशासन विभागातर्फे मंत्रालयात त्रिमूर्ती प्रांगणात आयोजित 'टेक वारी 2.0' अंतर्गत 'कलारंग : आर्ट, एआय अँड गव्हर्नन्स' या विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादात काळा घोडा आर्ट्स फेस्टिव्हलच्या संस्थापक आणि कलाकार बृंदा मिलर, शिल्पकार



अरझान खंबाटा, चित्रपट दिग्दर्शक रोहन सिप्पी आणि ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक अशोक कौल यांनी सहभाग घेतला. राष्ट्रीय आधुनिक कला संग्रहालयाच्या संचालक निधी चौधरी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाला सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही.राधा उपस्थित होत्या. काळा घोडा फेस्टिव्हलच्या आयोजक तथा संस्थापक बृंदा मेलर म्हणाल्या की, गेली 27 वर्ष काळा घोडा फेस्टिव्हलचे आयोजन केले जाते आहे. या फेस्टीव्हलमध्ये सातत्यता असल्यामुळेच हा फेस्टिव्हल यशस्वी आहे. कोणत्याही खाजगी फेस्टिव्हलला जर शासनाचा पाठिंबा मिळाला तर ते काम चांगले यशस्वी होते हेच काळाघोडा फेस्टिव्हलचे यश आहे. सुरूवातीला या फेस्टिव्हलला मर्यादा होती. आता फेस्टिव्हल शासनाच्या मदतीमुळे चांगला होत आहे याबद्दल त्यांनी शासनाचे आभार मानले.

ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक अशोक कौल यांनी चित्रपट क्षेत्रातील आपल्या प्रदीर्घ प्रवासातील बदलत्या तंत्रज्ञानाचा अनुभव कथन केला. सुरुवातीच्या काळात चित्रपटांमध्ये ॲनिमेशनचा वापर का करत नाही, असा प्रश्न विचारला जात असे. त्यानंतर त्यांनी स्वतःचे प्रशिक्षण केंद्र सुरू करून नवोदित कलाकारांना संधी दिली. "कलाकाराला शिखरापर्यंत पोहोचण्यापासून रोखणारे वारे, यशानंतर त्याच कलाकाराच्या पावलांवर डोकं टेकवतात," असे सांगत त्यांनी कलाकारांच्या संघर्षाचे वास्तव मांडले. एआयवर आधारित चित्रपटांच्या वाढत्या वापराबाबत बोलताना कौल म्हणाले, "चित्रपट हे केवळ तंत्रज्ञान नाही, तर मानवी भावनांचे माध्यम आहे. संवेदना आणि भावनिक स्पर्श नसलेला चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहोचू शकत नाही. आज वेळ वाचवण्यासाठी अनेक शॉर्टकट वापरले जात आहेत; मात्र चित्रपट हा विविध कलांचा संगम असल्याने त्यामध्ये मानवी स्पंदन टिकणे अत्यावश्यक आहे."

चित्रपट दिग्दर्शक रोहन सिप्पी यांनी एआयला चित्रपटसृष्टीसमोरील नवे आव्हान मानले. "प्रत्येक काळात चित्रपट क्षेत्रासमोर नवी आव्हाने उभी राहिली आणि ती काळानुसार बदलत गेली. एआयचा वापर वाढत असला, तरी मानवी कौशल्य आणि सर्जनशीलतेचे महत्त्व कायम राहणार आहे," असे ते म्हणाले. मुंबई ही देशाची चित्रपट राजधानी म्हणून अधिक सक्षम व्हावी, यासाठी चित्रपट क्षेत्रात कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगारनिर्मिती वाढवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. शिल्पकार अरझान खंबाटा यांनी सार्वजनिक कलेचे समाजातील महत्त्व अधोरेखित केले. "पब्लिक आर्ट म्हणजे समाजाला कलेशी जोडणारा एक भक्कम दुवा आहे. धातू, दगड, काच यांपासून बनवलेली भव्य शिल्पे, भित्तीचित्रे, लाईट इन्स्टॉलेशन्स आणि स्मारके समाजाच्या सांस्कृतिक जाणिवा समृद्ध करतात," असे ते म्हणाले. शिल्पकलेतही एआयचा वापर वाढत असला, तरी आयकॉनिक कलाकृती निर्माण करण्यासाठी कलाकाराची स्वतंत्र दृष्टी आणि संवेदनशीलता महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले.

परिसंवादात सहभागी मान्यवरांनी एआयचा वापर करताना अत्यंत सावधगिरी बाळगण्याची आवश्यकता व्यक्त केली. "एआय मदत करू शकते; मात्र त्याचा वापर कधी, कसा आणि किती करायचा याचे भान असणे आवश्यक आहे. पूर्णपणे एआयवर अवलंबून राहिलो, तर कला आणि चित्रपट यांचे मूळ अस्तित्व धोक्यात येऊ शकते," अशी भूमिका त्यांनी मांडली.

# डिजिटल युगात 'सायबर प्रतिकारशक्ती' काळाची गरज



## राज्य महिला आयोगाच्या बैठकीत विचारमंथन


**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

समाज माध्यमांच्या वाढत्या वापरासोबत सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सायबर सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात महत्त्वपूर्ण प्राथमिक बैठक आयोजित करण्यात आली. शाळा, महाविद्यालये तसेच गावागावांत जाऊन सायबर सुरक्षिततेबाबत व्यापक जनजागृती मोहीम राबविण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. बैठकीत सायबर सुरक्षा, बीएनएस व इंटरनेट कायदे, सामाजिक माध्यमांचा जबाबदारीने वापर आदी विषयांवर सविस्तर चर्चा झाली. "ज्याप्रमाणे शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती जंतूंशी लढते, त्याचप्रमाणे प्रत्येकाने आपली 'डिजिटल इम्युन सिस्टम' मजबूत करणे आवश्यक आहे," असा सूर उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

बैठकीस राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन उपस्थित होत्या. डॉ. विजय राठोड यांनी विद्यार्थ्यांसाठी सातत्यपूर्ण आणि विषयाधारित कार्यक्रमांची गरज व्यक्त करत शालेय स्तरावर सायबर संस्कार होणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. डॉ. जॅसमिन यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील सायबर हल्ल्यांच्या कार्यपद्धतीवर प्रकाश टाकला. सचिव आवडे यांनी सोशल मीडियावरील फेक अकाऊंट्स आणि फेक प्रोफाइल्सपासून विद्यार्थ्यांना सावध करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. 'अहन फाउंडेशन'चे उन्मेश जोशी व सोनाली पाटणकर यांनी सायबर कायदे व प्रत्यक्ष उदाहरणांसह प्रभावी सादरीकरण केले. विविध विभागांचे अधिकारी, समुपदेशक आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

# विजया देवकर यांची जनआरोग्य समितीच्या अध्यक्षपदी निवड

**कोपरगाव : हॅलो प्रभात**



कोपरगाव नगरपालिकेच्या नगरसेविका विजया संदीप देवकर यांची हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, संजयनगर जनआरोग्य समितीच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आदेशानुसार, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत नुकताच सदस्य निवड समारंभ पार पडला. यावेळी विजया देवकर यांची अध्यक्षपदी नियुक्ती जाहीर करण्यात आली. यापूर्वी नगरसेविका म्हणून त्यांनी विविध विकासकामांत सक्रिय सहभाग घेत सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पुढाकार घेतला आहे. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून ही जबाबदारी देण्यात आल्याचे बोलले जात आहे. आमदार विवेक कोल्हे व नगराध्यक्ष पराग संधान यांच्या मार्गदर्शनाखाली त्या प्रभावीपणे कार्यरत असून जनआरोग्य समितीच्या माध्यमातून आरोग्यविषयक सेवा अधिक सक्षम करण्यासाठी त्या प्रयत्नशील राहतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. या निवडीबद्दल माजी आमदार स्नेहलता कोल्हे, आमदार विवेक कोल्हे, नगराध्यक्ष पराग संधान, उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर तसेच नगरपालिकेतील पदाधिकारी व नगरसेवकांनी शुभेच्छा दिल्या.

## थोडक्यात पण महत्वाचे



### नसरापूर घटनेतील आरोपीला कठोर शिक्षा द्या : नागरिकांचे निवेदन

**राहुरी : हॅलो प्रभात**

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे चार वर्षीय बालिकेवरील अत्याचार व हत्येच्या घटनेनंतर राहुरी शहरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणातील आरोपीवर फास्टट्रॅक न्यायालयात खटला चालवून तातडीने कठोर शिक्षा करावी, अशी मागणी राहुरीतील ब्राह्मण संघटना व नागरिकांच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे आणि तहसीलदार डॉ. अमित पवार यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात या अमानुष कृत्याचा तीव्र निषेध व्यक्त करत शासनाने या प्रकरणासाठी विशेष सरकारी वकील व कायदेतज्ज्ञांची नियुक्ती करून खटला जलदगतीने निकाली काढावा, अशी मागणी करण्यात आली आहे.या घटनेमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून प्रशासनाने जनतेच्या भावना गांभीर्याने घेऊन आरोपीला कठोरातील कठोर शिक्षा द्यावी, अशी भावना व्यक्त करण्यात आली.

### पिंपरी-चिंचवड महापालिका पाणी नव्हे, विष पाजतेय..!

**पिंपरी : हॅलो प्रभात**

शहरातील नागरिकांना कमी दाबाने आणि अशुद्ध पाणीपुरवठा होत आहे. जेथून पाणी उचलतो, तेथे पवना नदी मृतावस्थेत आहे. पाण्याची चाचणी केली असता ते रासायनिक पाणी असल्याचे सिद्ध झाले आहे. प्रक्रिया करून ते पाणी किती शुद्ध होणार? त्यामुळे महापालिका नागरिकांना पाणी नाही तर विष पाजत असल्याचा आरोप नगरसेवकांनी मंगळवारी (दि. ५) सर्वसाधारण सभेत केला. उन्हाळा सुरू असून शहरात पाण्याची तीव्र टंचाई जाणवत आहे. यावर नगरसेवकांनी प्रशासनाला धारेवर धरले. शिंदेसेनेचे गटनेते विश्वजीत बारणे म्हणाले की, पवना नदीत सांडपाणी सोडण्यात येत आहे. रावेत बंधाऱ्याचे पाणी चाचणीसाठी घेऊन प्रयोगशाळात चाचणीसाठी देणार होतो. मात्र, त्यांनी पाण्याचे नमुने घेतले नाहीत. खासदारांचे पत्र दिले, तेव्हा एका प्रयोगशाळेने चाचणी केली. हे पाणी विषारी असल्याचा अहवाल प्रयोगशाळेने दिला आहे. संगीता ताम्हाणे म्हणाल्या की, शहरात पाण्याची टंचाई आहे. पाण्यात अळ्या असल्याचे वारंवार अधिकाऱ्यांना सांगितले आहे. श्रुती वाकडकर म्हणाल्या की, कमी दाबाने, अनियमित आणि अशुद्ध पाणी येत आहे. त्यामुळे अनेक नागरिक टँकरने पाणी खरेदी करीत आहेत. सुलभा उबाळे म्हणाल्या की, आपण नागरिकांच्या जीवाशी खेळत आहोत. शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचे पाप केले आहे. पाण्यासाठी खर्च करा. शैलजा मोरे, कुशाग्र कदम, निखिल बोऱ्हाडे, संदीप वाघेरे यांनीही प्रशासनाला धारेवर धरले.

### विवाहितेचे अपहरण; जबरदस्तीने दुसरे लग्न लावण्याच्या उद्देशाने प्रकार

**पुणे : हॅलो प्रभात**

आंबेगाव तालुक्यातील पारगाव परिसरात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, विवाहित मुलीचे तिच्याच वडिलांनी साथीदारांच्या मदतीने अपहरण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पारगाव कारखाना पोलिसांनी तातडीने कारवाई करत अवघ्या चार तासांत सात आरोपींना अटक करून उल्लेखनीय कामगिरी बजावली. ही घटना ४ मे २०२६ रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास घडली. सौ. साक्षी विशाल भागवत (रा. पारगाव, लबडे मळा, ता. आंबेगाव, जि. पुणे) या त्यांच्या सासरच्या व्यक्तीसोबत असताना, त्यांच्या वडिलांसह अन्य सहा जणांनी त्यांना अडवले. आरोपींनी मारहाण, शिवीगाळ व दमदाटी करत जबरदस्तीने वाहनात टाकून त्यांचे अपहरण केले. प्राथमिक तपासात या अपहरणामागील उद्देश पीडितेचे जबरदस्तीने दुसरे लग्न लावून देण्याचा असल्याचे समोर आले आहे. घटनेची माहिती मिळताच पारगाव कारखाना पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने तात्काळ हालचाल सुरू केली. विविध ठिकाणी शोधमोहीम राबवत पोलिसांनी अवघ्या चार तासांत सर्व आरोपींना अटक करण्यात यश मिळवले. या प्रकरणी शिवाजी भाऊ खाटेकर (वय ४५, रा. पारगाव, ता. आंबेगाव), अमोल चांगदेव रोडे (वय ३३), सचिन रावसाहेब रोडे (वय २९), अक्षय विश्वनाथ वाडगे (वय २९), अभिजीत बारकू रोडे (वय २६), नंदकिशोर विलास तितर (वय ३२, सर्व रा. नांदूर खंदरमाळ, ता. संगमनेर, जि. अहमदनगर) तसेच जयश्री अशोक कुदनर (वय ३५, रा. साकोर, ता. संगमनेर, जि. अहील्यानगर) यांना अटक करण्यात आली असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बॅडी स्केटिंग राष्ट्रीय स्पर्धेत केडगावच्या चिमुकल्यांची चमक

**देऊळगाव गाडा : हॅलो प्रभात**



## महाराष्ट्राला अजिंक्यपद

गोवा येथे पार पडलेल्या आठव्या बॅडी स्केटिंग राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत दौंड तालुक्यातील केडगाव येथील ग्रेट स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत महाराष्ट्र संघाला यश मिळवून दिले. या स्पर्धेत विविध गटांमध्ये पदके पटकावत चिमुकल्या खेळाडूंनी आपली गुणवत्ता सिद्ध केली. २५ ते २६ एप्रिलदरम्यान गोवा येथील मीरामार युद्ध होस्टेलमध्ये राष्ट्रीयस्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. बॅडी स्केटिंग हा रशियन हॉकी प्रकारातील खेळ असून स्केटिंग घालून हॉकी खेळली जाते. स्पर्धेत उत्तर प्रदेश, गुजरात, हरियाणा, पंजाब, कर्नाटक, तेलंगणा, तमिळनाडू तसेच महाराष्ट्रातील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे नेतृत्व ग्रेट स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंनी करत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. १० वर्षाखालील मुलींच्या गटात मनीषा दळवी, श्रद्धा पाडुळे आणि आरोही चौधरी यांनी सुवर्णपदक पटकावले. तर १० वर्षाखालील मुलांच्या गटात ऋत्विक कुंभार, राजवीर दळवी, साईराज पाडुळे, रुद्र गोसावी आणि हर्ष शेंडगे यांनी कांस्यपदक मिळवले. १४ वर्षाखालील मुलांच्या गटात अंश यादव, क्षितिज कुंभार, गंधार नवले आणि दिव्यांशू जाधव यांनी कांस्यपदकाची कमाई केली. तसेच १७ वर्षाखालील मुलींच्या गटात प्रणिती दत्तात्रय धुमाळ हिने कांस्यपदक मिळवून यश संपादन केले. या यशामागे ग्रेट स्पोर्ट्स अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक समाधान दाने, गणेश घुगे, आकाश कसबे, यश बारवकर तसेच प्रशिक्षक कांचन निवसे व अनुराधा निकम यांचे मार्गदर्शन लाभले. महाराष्ट्र संघाचे सचिव मदन बदर, संदीप टेंगले, डॉ. लोणकर आणि विजय टिपूगडे यांनीही खेळाडूंना प्रोत्साहन दिले. खेळाडूंच्या या यशाबद्दल पालक व परिसरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# पत्नी घर सोडून गेली अन् बाप बनला हैवान?

**पुणे : हॅलो प्रभात**

कौटुंबिक वाद आणि पत्नी घर सोडून गेल्याच्या नैराश्यातून एका पित्याने स्वतःच्या चिमुकल्या मुलीची हत्या केल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. पुणे-नाशिक महामार्गालगत संतवाडी परिसरात ही धक्कादायक घटना उघडकीस आली असून संपूर्ण परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणी सागर सदाशिव शिंदे (वय २९, रा. मोशी, पुणे) याला आळेफाटा पोलीस स्टेशन यांनी अटक केली आहे. आरोपीची पत्नी सुमारे सहा महिन्यांपूर्वी घर सोडून गेली होती. त्यानंतर दोन लहान मुलांचा सांभाळ करताना आरोपी मानसिक तणावात होता. याच कारणातून त्याने टोकाचा निर्णय घेतल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. ५ मे रोजी सकाळी आरोपीने मुलगा आर्यन (वय ५) आणि मुलगी हर्षदा (वय ३.५) यांना फिरायला घेऊन जात असल्याचे सांगून घराबाहेर नेले. रात्री उशिरा त्याने संतवाडी येथील निर्जन जंगल परिसर गाठला. तेथे प्रथम मुलगा आर्यनचा गळा दाबून त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केला. आर्यन बेशुद्ध पडल्याने तो मृत झाल्याचे समजून आरोपीने त्याला जंगलातच टाकून दिले.

# राहुरी वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड. तोडमल बिनविरोध

**राहुरी : हॅलो प्रभात**



राहुरी तालुका वकील संघाच्या २०२६-२७ या वर्षासाठी झालेल्या निवडणुकीत अध्यक्षपदी ॲड. डी. आर. तोडमल यांची बिनविरोध निवड झाली. उपाध्यक्षपदी ॲड. प्रकाश मारुती संसारे, महिला उपाध्यक्षपदी ॲड. जयश्री दत्तात्रय घावटे, तर सचिवपदी ॲड. शशिकांत गजानन देशमुख यांची बिनविरोध निवड झाली. याशिवाय सहसचिवपदी ॲड.राहुल दिवे, खजिनदारपदी ॲड. असीफ शेख, सहखजिनदारपदी ॲड. दीपक सगळगिळे यांची निवड झाली. सदस्यपदी ॲड. विशाल फिलीफ संसारे, ॲड. मनोज पारखे, ॲड. नवेद बागवान, ॲड. सुरेखा कुलकर्णी, ॲड. विद्या अनाप आणि ॲड. अनिता तोडमल यांची निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ज्येष्ठ सदस्य ॲड. बी. बी. उऱ्हे यांनी कामकाज पाहिले. त्यांना ॲड. पागिरे यांनी सहकार्य केले. निवडीनंतर बोलताना अध्यक्ष ॲड. तोडमल यांनी राहुरी येथे जिल्हा व सत्र न्यायालय सुरू करणे, नवीन इमारत उभारणीसाठी पाठपुरावा करणे तसेच वकिलांच्या प्रश्नांसाठी प्रभावीपणे काम करणार असल्याचे सांगितले.

# संशोधनाचा लाभ शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचवा

## डॉ. विलास खर्चे ; धुळे कृषी महाविद्यालयात कुलगुरूंचे प्रतिपादन

**राहुरी : हॅलो प्रभात**



विद्यापीठातील संशोधनाचा प्रत्यक्ष फायदा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला पाहिजे. प्रयोगशाळेतील तंत्रज्ञान थेट शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत नेण्यासाठी शास्त्रज्ञांनी नाविन्यपूर्ण विस्तार पद्धतीचा अवलंब करावा, असे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले. धुळे येथील शासकीय कृषी महाविद्यालयाच्या भेटीदरम्यान आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी. एम. इल्हे, विद्यापीठ अभियंता मिलिंद ढोके, डॉ. संदीप पाटील, डॉ. राहुल देसले, डॉ. विश्वनाथ शिंदे आणि डॉ. दिनेश नांद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. कुलगुरू डॉ. खर्चे म्हणाले, आगामी काळात शेतीसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. संतुलित खतांचा वापर, हवामान अनुकूल शेती, नैसर्गिक शेतीचा प्रसार आणि एकात्मिक शेती पद्धतीवर विशेष भर देणे आवश्यक आहे. ग्रामीण युवकांना शेतीकडे आकर्षित करण्यासाठी कृषी उद्योजकता विकास आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना तांत्रिक पाठबळ देणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी 'संतुलित खत वापर जागरूकता अभियान-२०२६' या भित्तीपत्रिकेचे अनावरण करण्यात आले. कुलगुरूंनी महाविद्यालयातील विविध विभाग, बाजरी संशोधन केंद्र आणि कृषी विज्ञान केंद्राला भेट देत कामकाजाचा आढावा घेतला.

प्रास्ताविक डॉ. बी. एम. इल्हे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. जगदीश काथपुरी यांनी तर आभार डॉ. विकास पवार यांनी मानले. कार्यक्रमास अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दक्षिणकाशी पुणतांबा तीर्थक्षेत्र विकासासाठी निधीची मागणी

**कोपरगाव : हॅलो प्रभात**



## स्नेहलता कोल्हे यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील दक्षिणकाशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणतांबा येथील श्री योगीराज चांगदेव महाराज व श्री कार्तिकस्वामी महाराज मंदिर तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच गोदावरी नदीवरील घाटांच्या पुनर्बांधणीसाठी विशेष निधी मंजूर करावा, अशी मागणी माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

अहिल्यानगर जिल्हा हा ऐतिहासिक व पौराणिक वारसा लाभलेला जिल्हा असून कोपरगाव मतदारसंघातील पुणतांबा गावाला धार्मिक दृष्ट्या विशेष महत्त्व आहे. येथे दरवर्षी राज्यभरातून हजारो भाविक श्री चांगदेव महाराज समाधी, श्री कार्तिकस्वामी मंदिर तसेच गोदावरी नदीकाठी असलेल्या अहिल्यादेवी होळकर घाट, विठ्ठल घाट आणि ब्राह्मण घाट येथे दर्शनासाठी येत असतात.

सन २०२७ मध्ये नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर पुणतांबा येथेही मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी अपेक्षित आहे. त्यामुळे घाट पुनर्बांधणी, स्वच्छता सुविधा, रस्ते, प्रकाशयोजना, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि इतर मूलभूत सुविधा तातडीने उभारणे आवश्यक असल्याचे कोल्हे यांनी पत्रात नमूद केले आहे. पुणतांबा हे धार्मिक आणि ऐतिहासिक वारसा लाभलेले गाव असून येथील प्राचीन मंदिरांचा परिसर अधिक विकसित व आकर्षक करण्यासाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भाविकांच्या सोयीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत पुणतांबा तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी संबंधित विभागांना तातडीने सूचना द्याव्यात, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

# मार्कशीटमधील खाडाखोड कळली अन् बापाची सटकली

**पुणे : हॅलो प्रभात**

परीक्षेतल्या गुणांवरुन संतापलेल्या एका पित्याने आपल्याच ९ वर्षांच्या चिमुरडीचा जीव घेतला. पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील देउळगाव राजे गावात ही अत्यंत संतापजनक आणि मन सुन्न करणारी घटना घडली. वर्गात सावत्र भावापेक्षा कमी गुण मिळाल्याने रागातून आणि मार्कशीटमध्ये खाडाखोड केल्याने संतापलेल्या बापाने आपल्याच मुलीची लाकूड कापण्याच्या कटरने गळा चिरून निर्दयीपणे हत्या केली. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी शांताराम दुर्योधन चव्हाण याच्या मुलाचा (संस्कार) आणि मुलीचा शाळेचा निकाल जाहीर झाला होता. या परीक्षेत संस्कार वर्गात पहिला आला होता, तर अनामिका दुसऱ्या क्रमांकावर राहिली होती. निकालावरून मुलाने अनामिकाला चिडवल्यामुळे ती दुखावली गेली होती. भावापेक्षा मागे राहिल्याच्या दबावातून तिने आपल्या मार्कशीटमध्ये खाडाखोड करून स्वतःला पहिल्या क्रमांकावर आणि भावाला दुसऱ्या क्रमांकावर दाखवले.

# सुट्ट्या पैशांवरून झालेला वाद गेला विकोपाला

- आईस्क्रीम विक्रेत्याच्या धक्क्यामुळे तरुणाचा मृत्यू
- वालचंदनगर पोलिसांकडून आरोपी अवघ्या ०३ तासांत जेरबंद

**बारामती शहर : हॅलो प्रभात**




घोलपवाडी, उदमाईवाडी आणि पवारवाडी या चार गावांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या उदमाईदेवी यात्रेत सुट्ट्या पैशांच्या वादातून एका तरुणाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी वालचंदनगर पोलिसांनी संबंधित आईस्क्रीम विक्रेत्यास अटक केली असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १ मे २०२६ रोजी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास सुरज हिंमत तुपे (रा. उध्दट, ता. इंदापूर) व त्यांचा मित्र दादा रावण इंगळे (वय २३) हे दोघे उदमाईदेवी यात्रेत फिरण्यासाठी आले होते. यात्रेतील गर्दीत फिरत असताना त्यांनी मंदिर परिसरातील एका आईस्क्रीम गाडीवर फालुदा आईस्क्रीम खाल्ले. त्यानंतर सुट्ट्या पैशांवरून त्यांचा विक्रेत्यासोबत वाद झाला. वाद वाढल्यानंतर संबंधित विक्रेत्याने दादा इंगळे यांना शिवीगाळ केली. त्यावेळी इंगळे हे आईस्क्रीम गाडीवर चढले असता आरोपीने त्यांना जोरात ढकलून दिले. त्यामुळे ते डांबरी रस्त्यावर कोसळले व त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाला. दरम्यान, मित्रांनी दादा इंगळे यांना तातडीने बारामती येथील महिला शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांना मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच वालचंदनगर पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. तपासादरम्यान आरोपीचे नाव किसन शंकरलाल प्रजापती (सध्या रा. बरड, ता. फलटण, जि. सातारा) असे निष्पन्न झाले. पोलिसांनी दोन स्वतंत्र तपास पथके तयार करून आरोपीचा शोध सुरू केला. गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी बरड येथे मूळ गावी पळून जाण्याच्या तयारीत असल्याचे समोर आले. त्यानुसार पोलिसांनी तातडीने कारवाई करत त्याला ताब्यात घेत अटक केली.

या प्रकरणी सुरज तुपे यांच्या फिर्यादीवरून वालचंदनगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), ३५२ तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड करीत आहेत.